

बिरबल आणि बादशहा



वि.स.सुखटणकर

बिरबल आणि बादशहा

(यांच्या ५० चटकदार गोष्टी)

संचित

लेखक

वि. स. सुखटणकर

उमा पब्लिकेशन्स, पुणे ३०.

❖ **प्रकाशक :**
उमा पब्लिकेशन्स
उमेश मेहेंदळे,
३८०, नारायण पेठ, शगुन चौक,
पुणे - ४११ ०३०. फोन : ४४८९०७२

❑

❖ **नवी आवृत्ती :** एप्रिल २००३

❑

❑

❖ **मुद्रक :**
अनिल अपूर्व प्रिंटर्स
७५९/७४, प्रभात रोड,
पुणे - ४११ ०३०.

कथानुक्रम

बिरबल आणि बादशहा

यांच्या ५० चटकदार व बोधप्रद गोष्टी

१ : बिरबलाची परीक्षा

आपल्या या देशात विद्येचे भोक्ते असे जे अनेक राजे प्राचीन काळी होऊन गेले, त्यात अकबर बादशहाला फार वरचे स्थान दिले पाहिजे. निरनिराळ्या धर्मांमध्ये, शास्त्रांमध्ये, कलांमध्ये पारंगत अशा गुणी लोकांना त्याने आपल्या दरबारात आश्रय दिला होता. अकबर बादशहाचा अशारीतीने आश्रय मिळालेल्या विद्वानांमध्ये नऊजण तर इतके नामांकित होते की, त्यांना अकबर बादशहाच्या दरबारातील नऊ रत्ने असे म्हणतात.

बिरबल नावाचा एक कनोजी पंडित हा या नवरत्नांपैकी एक होय. अकबर बादशहाची या बिरबलावर फार मर्जी होती. त्याचे कारण हे की, या बिरबलाच्या अंगी नुसता विद्वत्तेचाच गुण होता असे नाही, तर शौर्यही त्याच्या अंगी होते. अकबर बादशहाबरोबर जाऊन अनेक लढायांमध्ये त्याने तलवार गाजवली होती व त्याला मरणही शेवटी एका लढाईमध्येच आले.

अकबर बादशहाची व बिरबलाची प्रथम ओळख कशी झाली यासंबंधी एक गोष्ट सांगितली जाते, ती पुढीलप्रमाणे -

एकदा बादशहापुढे एका बहुरूप्याचा खेळ चालला होता.



पडद्याआड बादशहाची बेगम हा खेळ पाहत होती. त्याचप्रमाणे मोठमोठे अमीर-उमराव, सरदार-दरकदार हा खेळ पाहायला आले होते. खुद्द बादशहा व त्याच्या दरबारातले बडे लोक आपला खेळ पाहायला आले आहेत असे पाहिल्याने बहुरूप्याने मोठ्या हौसेने आपले जास्तीत जास्त चांगले असे खेळ अत्यंत कौशल्याने करून दाखविले. ते पाहून सर्वजण इतके खूष झाले की, बादशहा, बेगम त्याचप्रमाणे अमीर-उमराव इत्यादि लोकांनी आपापल्या गळ्यातले मोत्यांचे कंठे, हातातल्या अंगठ्या, रेशमी शेले, मंदिल अशा बहुमोल वस्तू बक्षिसादाखल त्याला दिल्या. शेवटी या बहुरूप्याने बैलाचे सोंग आणले. बैलाप्रमाणे डरकाळ्या फोडणे, शिंगांनी जमीन उकरणे, चौखूर उधळणे इ. बैलाच्या क्रिया इतक्या हुबेहूब त्याने करून

दाखविल्या की, या त्याच्या सोंगावरसुद्धा खूष होऊन बऱ्याच जणांनी अनेक मौल्यवान वस्तू बक्षिसादाखल त्याच्या अंगावर फेकल्या.

शेवटी बैलाचे हे सोंग अनेक प्रकारांनी करून दाखविल्यानंतर तो बहुरूपी आपल्या खोलीकडे जाऊ लागला, तोच त्याची सोंगे पाहत दूर उभ्या असलेल्या खालच्या वर्गातील लोकांपैकी एका पोराने एक काकडी त्याच्या अंगावर फेकली. ती काकडी अंगाला लागताच बहुरूप्याने आपले अंग हुबेहूब बैलासारखे थरथरवले. हे पाहिल्यावर तो पोरगा खूष झाला व त्याने आपल्या डोक्याची फाटकी टोपी काढून ती बक्षीस म्हणून बहुरूप्याला देऊन टाकली. तेव्हा तो बहुरूपी ती टोपी हातात घेऊन म्हणाला, ''आतापर्यंत मला मिळालेल्या सर्व बक्षिसांमध्ये, हे बक्षीस सर्वांत जास्त मोलाचे आहे!''

बहुरूप्याने आतापर्यंत जरी अनेक सोंगे वठवली होती, तरी काकडी अंगाला लागल्यावर तत्क्षणी बैलासारखे अंग थरथरवणे यातच त्याच्या कसबाची खरीखुरी परीक्षा होती. ती परीक्षा घेऊनच त्या मुलाने त्याला आपली टोपी दिली. अशारीतीने त्याने आपल्या गुणाची खरी परीक्षा केली. त्याने दिलेले बक्षीस क्षुल्लक असले, तरी इतरांनी दिलेल्या मौल्यवान वस्तूंपेक्षा त्या बक्षिसाची किंमत अधिक आहे असा त्या बहुरूप्याच्या बोलण्याचा अर्थ होता, ही गोष्ट बादशहाने जाणली व बहुरूप्याची अशारीतीने परीक्षा घेणाऱ्या त्या मुलाच्या बुद्धिचातुर्याचे त्याला कौतुक वाटले. हा मुलगा आपल्या मोठेपणी नावारूपाला आल्याशिवाय राहणार नाही, असे ठरवून बादशहाने त्याला आपल्या पदरी तेव्हापासून आश्रय दिला.

हा मुलगाच पुढे बादशहाच्या दरबारात बिरबल या नांवाने प्रसिद्धीस आला.

●

२ : प्राण्यास सर्वांत प्रिय काय?

एक दिवस बादशहा व बिरबल गप्पागोष्टी करीत बसले असता बादशहाने त्याला प्रश्न केला, ''प्राण्यास सर्वांत प्रिय काय?''

बिरबलाने उत्तर केले, ''प्राणिमात्राला सर्वांत प्रिय म्हणजे स्वतःचा जीव!''

बादशहाला त्याचे हे उत्तर बरोबर वाटले नाही. तो म्हणाला, ''प्राण्यांना स्वतःच्या जिवापेक्षाही आपले मूल प्रिय असते. मनुष्याची गोष्ट तर सोडाच, पण पशु-पक्ष्यांसारखे प्राणीसुद्धा प्रसंगी आपल्या जिवावर उदार होऊनसुद्धा आपल्या बच्चाचे रक्षण करतात. यावरून ही गोष्ट सिद्ध होते.''

बादशहाचे हे भाषण ऐकून बिरबल म्हणाला, ''खाविंद, आपले म्हणणे खरे की माझे म्हणणे खरे याचे प्रत्यंतर आपण आताच पाहू.''

नंतर बिरबलाने एका वानरीला तिच्या बच्चासह एक मोठ्या, रिकाम्या हौदात सोडून दिले. मग त्या हौदात पाणी सोडायला सुरुवात केली. प्रथम त्या वानरीने पोर पाण्यात बुडून मरू नये म्हणून त्याला वर उचलून घेतले. वानरीच्या कंबरेपर्यंत पाणी चढल्यावर तिने त्या पोराला आपल्या खांद्यापर्यंत चढवले. थोड्या वेळाने पाणी तिच्या खांद्यापर्यंत चढले तेव्हा

तिने आपल्या पोराला डोक्यावर ठेवले. पण हौदात जास्ती पाणी येऊन स्वतःच्याच नाकातोंडात तेव्हा पाणी शिरू लागले व त्या हौदात बुडून मरण्याची जेव्हा तिच्यावर पाळी आली तेव्हा डोक्यावर ठेवलेले आपले पोर तिने चटकन आपल्या मांडीखाली घातले व त्यावर ती बसली.

बादशहाला ही गोष्ट दाखवून दिल्यावर बिरबलाने त्या वानरीला व तिच्या पोराला हौदाबाहेर काढले व त्यांचे जीव वाचवले.

वानरीची ही कृती पाहिल्यावर बादशहाने ''प्रत्येक प्राण्याला सर्वांत प्रिय आपला जीव'' हे बिरबलाचे म्हणणे खरे असल्याचे कबूल केले.

●

३ : बादशहाचा पोपट!

बादशहाने एक पोपट पाळला होता. तो पोपट बादशहाचा इतका आवडता होता की, ''या पोपटाच्या खाण्यापिण्यात जर कोणी हेळसांड केली व त्यामुळे तो मेला, तर ती बातमी सांगणाऱ्याचे मी डोके उडवीन.'' असे त्याने आपल्या नोकरांना बजावले होते. पण त्याबरोबरच त्या नोकरांना बादशहाने अशीही ताकीद देऊन ठेवली होती की, आपल्या या पोपटाची तब्येत थोडी जरी बिघडली तरी त्या गोष्टीची आपल्याला लगेच वर्दी मिळाली पाहिजे.

पुढे असे झाले की, बादशहाचा हा पोपट कांही आजार होऊन एकाएकी मेला. सर्व नोकर आता माठ्या काळजीत

पडले. पोपट मेला ही गोष्ट बादशहाला कळवावी, तर ती गोष्ट कळविणाऱ्याचे तो डोके उडवणार. बरे न कळवावी तर त्याबद्दल सर्व नोकरांना काहीतरी जबर शिक्षा भोगावी लागणार. त्यांना या अडचणीतून कसा मार्ग काढावा हे कळेना. शेवटी त्या सर्वांनी बिरबलाची गाठ घेतली व काहीतरी युक्ती योजून या संकटातून आपल्याला पार पाडण्याची त्यांनी त्याला विनंती केली. तेव्हा त्या नोकरांस निर्धास्त राहण्यास सांगून बिरबल बादशहाकडे गेला व घाबऱ्या आवाजाने म्हणाला, "सरकार, आपला राघू! आपला राघू!"

यावर बादशहाने दचकून विचारले,

"काय? मेला की काय!"

बिरबलाने उत्तर केले, छेः छेः! तसे कसे म्हणेन मी? पण सरकार, आपला राघू तपस्वी बनला आहे व निश्चल स्थितीत तो ध्यान करीत आहे. त्याने आकाशाकडे तोंड केले आहे, चोंच वासली आहे व आपल्या पंखांची व पायांची हालचाल करणे अजिबात बंद केले आहे!"

हे ऐकून बादशहा म्हणाला, "अरे मग तो मेला असे म्हण!"

"छेः छेः सरकार, आपण पाहिजे तर तसे म्हणा. पण मला वाटते की, तो तपस्व्याप्रमाणे ध्यान करीत आहे. पाहिजे तर सरकारांनीच येऊन त्यास एकदा पाहावे व काय ते ठरवावे." बिरबलाचे शब्द ऐकून बादशहाला या गोष्टीचे मोठेच गूढ वाटले व तो बिरबलाबरोबर पोपटाच्या पिंजऱ्याजवळ गेला. पिंजऱ्यात पोपटाची झालेली अवस्था पाहताच बादशहा रागावून बिरबलाला म्हणाला, "बिरबल, तू स्वतःला एवढा शहाणा

समजतोस आणि माझा हा राघू मेला ही साधी गोष्टही तुला कळत नाही, याला काय म्हणावे?''

''सरकार, ही गोष्ट न कळण्याइतका मी निर्बुद्ध आहे म्हणूनच मी आज वाचलो. जर ती मला कळती व आपल्याकडे मी ती बोलून दाखवली असती तर मी आज माझ्या जिवास मुकलो असतो.''

बिरबलाचे हे खुबीचे उत्तर ऐकून ''राघू मेला ही बातमी आणणाऱ्याचे मी डोके उडवीन!'' अशी आपण सर्वांना ताकीद दिली होती, या गोष्टीची बादशहाला आठवण झाली व या प्रसंगी बिरबलाने दाखविलेल्या चतुरपणाबद्दल तो त्याच्यावर खूष झाला.

●

४ : बादशहाचे पाच प्रश्न

आपल्या दरबारातल्या लोकांच्या बुद्धीची परीक्षा पाहण्याकरिता अधूनमधून त्यांना काहीतरी गूढ प्रश्न विचारण्याची बादशहाला सवय होती. त्या सवयीप्रमाणे त्याने एकदा पुढील पाच प्रश्न आपल्या दरबारातल्या लोकांना विचारले -

१) सर्वांत फूल कशाचे मोठे? २) मोठा दात कोणाचा? ३) पुत्र कोणाचा मोठा? ४) सर्व राजांमध्ये मोठा राजा कोण? ५) सर्व गुणांत मोठा गुण कोणता?

बादशहाच्या या प्रश्नांची बहुतेकजणांनी उत्तरे दिली ती अशी -

१) सर्वांत गुलाबाचे फूल मोठे. २) दात हत्तीचा मोठा.



३) पुत्र राजाचा मोठा. ४) राजांत सार्वभौम राजा मोठा व ५) सर्वांत मोठा गुण म्हणजे विद्या.

यानंतर बादशहाने हेच प्रश्न बिरबलाला विचारल्यावर बिरबलाने उत्तरे दिली की -

१) फूल कापसाचे मोठे, कारण त्यापासून सर्व लोकांना वस्त्र वापरायला मिळते.

२) दात नांगराचा मोठा, कारण त्याच्यायोगे जमिनीत बी रूजून त्यापासून धान्य निर्माण होते.

३) पुत्र गाईचा मोठा, कारण त्यास नांगरास जुंपून जमीन नांगरतात व त्यामुळेच धान्य तयार होते.

४) सर्व राजांत मेघराजा मोठा, कारण त्याच्या वृष्टीने सर्व पृथ्वीचे पोषण होते.

५) सर्व गुणात धारिष्ट्य हा गुण मोठा, कारण मुळी म्हणच अशी आहे की "धारिष्टास दैव धार्जिणे."

बिरबलाची समर्पक उत्तरे ऐकून बादशहाने त्याच्या बुद्धीची तारीफ केली.

●

५ : बिरबलाने चोर पकडला

कोणी एका सौदागराने एक दुर्मीळ जातीचा सुंदर राजहंस पक्षी जबर किंमत देऊन खरेदी केला व तो पक्षी बादशहाला नजर करावा असे ठरवून तो पक्षी घेऊन तो दिल्ली शहरात आला. पण त्या सौदागराने बादशहास तो पक्षी नजर करण्याआधीच पिंजऱ्यातून तो पक्षी एकाएकी नाहीसा झाला. आपल्या नोकरांपैकी कोणीतरी हा पक्षी मारून खाल्ला असावा असा त्या सौदागरास वहीम आला, पण त्याच्या नोकरांपैकी कोणीच ती गोष्ट कबूल करेना. तेव्हा तो याबाबतीत आपली फिर्याद घेऊन बादशहाकडे आला. बादशहाने सौदागराची फिर्याद ऐकून घेतली व नंतर त्याच्या सर्व नोकरांस आपल्यासमोर बोलावून आणून त्यांना धाकदपटशा दाखविला व ज्याने तो गुन्हा केला असेल त्याने तो कबूल करावा असा हुकूम केला. पण त्या नोकरांपैकी प्रत्येकजण या बाबतीत आपल्या कानावर हात ठेवू लागला. गुन्हेगार कसा शोधून काढावा याबद्दल बादशहाला आता मोठीच पंचाईत पडली. ज्या ज्या गोष्टीमध्ये बादशहाची बुद्धी कुंठित होई ती ती गोष्ट तो बिरबलाकडे निर्णयासाठी सोपवीत असे. त्याप्रमाणे त्याने आता हे प्रकरणही बिरबलाकडे सोपविले.

बिरबलाने थोडा वेळ विचार केला. मग त्या सौदागराच्या सर्व नोकरांना आपल्यापुढे आणवून ओळीने उभे केले. नंतर

त्या सर्वांकडे एकवार नजर फेकून बिरबल मोठ्याने हसून म्हणाला, ''काय हो हा चोर धारिष्टवान् ! पक्षी मारून खाल्ला तो खाल्लाच; पण पक्ष्याचे पीस पागोट्यांत खोवून येथे आला



आहे आणि तरीसुद्धा आपला गुन्हा कबूल करीत नाही!''

बिरबलाचे हे शब्द कानावर पडताच ज्या नोकराने पक्षी मारला होता, तो दचकला व कोणाच्या लक्षात न येई- अशारीतीने त्याने हळूच आपल्या पागोट्यास आत लावून पा- ही गोष्ट इतर कोणाच्या लक्षात आली नाही, पण बिरबल त्या सर्वांकडे बारीक नजरेने पाहत होता; त्याच्या ही गोष्ट लक्षात आली व पागोट्यास हात लावून पाहणाऱ्या त्या नोकरानेच पक्षी मारून खाल्ला असला पाहिजे, असे त्याने ठरविले. नंतर त्या नोकरास एका खांबास बांधून त्याच्या पाठीवर फटके

मारण्याची बिरबलाने आज्ञा केली. तेव्हा माराच्या भयाने त्या नोकराने आपण पक्षी मारला ही गोष्ट कबूल केली व पक्षाची पिसे त्याने जेथे लपवून ठेवली होती ती जागाही त्याने दाखविली.

अशारीतीने बरोबर चोर पकडण्यासाठी बिरबलाने दावविलल्या चातुर्याबद्दल बादशहाने त्याची वाहवा केली.

●

६ : बिरबलाचा हजरजबाबीपणा

एकदा बादशहा व राणी दोघेही आपल्या महालात आंबे खात असताना बादशहाने असा क्रम ठेवला होता की, एकेक आंबा खाऊन झाल्यावर त्याची साल राणीपुढे टाकावी. त्याचे अशारीतीने आंबे खाणे चालले आहे अशा वेळी बिरबल तेथे आला. तेव्हा राणीची चेष्टा करण्याकरिता बादशहा बिरबलास म्हणाला, ''आमच्या राणीसाहेब पाहा किती खादाड आहेत! माझा अजून एकसुद्धा आंबा पुरता खाऊन झाला नाही तोच यांनी किती आंबे फस्त केले पाहा!'' असे म्हणून राणीच्या पुढे पडलेल्या आंब्यांचा सालीच्या ढिगाऱ्याकडे बादशहाने बोट दाखविले.

यावर राणीची बाजू घेऊन बादशहाला खजील करावे असे ठरवून बिरबल म्हणाला, ''राणीसाहेब खादाड खऱ्या, पण खादाडपणात आपण त्यांनाही मागे टाकले आहे. कारण राणी साहेबांनी आंब्यामधला रस तेवढा चोखून खाल्ला व साली टाकून दिल्या. पण आपण सालीसुद्धा शिल्लक ठेवल्या नाहीत, त्यासुद्धा खाऊन टाकल्या. पाहा, आपल्यापुढे एक तरी साल दिसते आहे काय?''

बिरबलाचे हे हजरबाबी भाषण ऐकून बादशहा व राणी या दोघांनाही फार आनंद झाला.

•

७ : एका निरपराधी माणसाचा जीव वाचविला

दिल्ली शहरात एक गरीब मनुष्य राहत असे. त्या बिचाऱ्याविषयी लोकांनी अशी अफवा उठवली होती की, ''त्याचे तोंड सकाळीच ज्याला दिसेल त्याला सबंध दिवस अन्न मिळत नाही.''

ही त्या माणसाविषयी अफवा बादशहाच्या कानांवर गेली व त्या गोष्टीचीं आपण स्वतः प्रचीति घेऊन पाहावी, असे बादशहाने ठरविले. लगेच बादशहाने त्या माणसास पकडून आणून ठेवले व दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्याबरोबर प्रथम त्याचे तोंड पाहिले. कर्मधर्मसंयोगाने बादशहा त्या दिवशी जेवायला बसला तोच त्याच्या ताटात वरून पाल पडली. तेव्हा बादशहा जेवण टाकून उठला व ''त्या माणसाचे आपण सकाळी तोंड पाहिले होते म्हणूनच असे झाले'' असे ठरवून संतापाच्या भरात त्या माणसास एकदम सुळी देण्याचा त्याने आपल्या सेवकांस हुकूम केला.

ही गोष्ट जेव्हा बिरबलाच्या कानावर गेली, तेव्हा बिरबलाने त्या माणसाची गाठ घेऊन त्याच्या कानात त्याला काहीतरी सांगितले.

नंतर बादशहाच्या सेवकांनी त्या माणसास सुळी देण्याकरिता वधस्थानी नेले व त्याला सुळी देण्यापूर्वी ''तुझी

शेवटची इच्छा काय आहे?'' असे त्यास विचारले. त्याने उत्तर दिले, ''माझे तोंड पाहिले तर लोकांना अन्नच खावयास मिळत नाही. परंतु मी आज सकाळी बादशहाचे तोंड पाहिले, त्यामुळे माझ्यावर प्राणाला मुकण्याची पाळी आली आहे. तरी यापुढे लोकांनी बादशहाचे तोंड पाहण्याचे सोडून द्यावे, हा माझा निरोप बादशहाला व त्याच्या दरबारातील लोकांना कळवा व मग मला सुळी द्या.''

सेवकांनी जाऊन हा त्याचा निरोप बादशहाला दरबारात सांगितला. तेव्हा बादशहाला आपली चूक कळून आली व त्याला आपल्या कृतीचा पश्चाताप होऊन त्या माणसाला सुळी देण्याचा आपला हुकूम रद्द केल्याचे त्याने आपल्या सेवकास सांगितले. इतकेच नव्हे; तर त्यास द्रव्य दिले व त्याचे दारिद्र्य दूर केले.

बादशहाला अशा तऱ्हेचा निरोप पाठवावा ही युक्ती त्या माणसाला बिरबलानेच सुचविली होती, हे सांगावयाला नकोच!

●

८ : बिरबल व तानसेन

बिरबल दिवसेंदिवस बादशहाला अधिकाधिक प्रिय होत चालला व शेवटी बादशहाने त्याला आपल्या वजिराच्या जागेवर नेमले. पण बिरबलाचा हा उत्कर्ष दरबारातल्या इतर काही लोकांना सहन होईना. बादशहाच्या पदरी तानसेन नावाचा एक नामांकित गवई होता. त्याच्यावर बादशहाची बरीच मर्जी होती. तेव्हा बिरबलाचे वजीरपद काढून घेऊन ते या तानसेनास देण्याबद्दल बादशहाला गळ घालावी व अशारीतीने बिरबलाला

खाली ओढण्याचा प्रयत्न करून पाहावा, असा या दरबारातल्या लोकांनी घाट घातला. नंतर एक दिवस तानसेनच्या गाण्याची मैफल ठरवून त्या मैफलीला दरबारी लोकांनी बादशहाला बोलावणे केले. बादशहा व इतर निमंत्रित मंडळी आल्यावर तानसेनने गावयाला सुरुवात केली. ती संध्याकाळची वेळ असल्यामुळे त्याने प्रथम दीपराग आळवण्यास सुरुवात केली. त्याबरोबर त्या महालातले सर्व दीप एकदम प्रकाशित झाले. हा चमत्कार पाहून बादशहा आश्चर्याने थक्क होऊन गेला व तानसेनाला त्याच्या गायनविद्येबद्दल त्याने शाबासकी दिली. बादशहाची मर्जी तानसेनावर सुप्रसन्न झाली आहे, अशी ही संधी आपला हेतू साधून घेण्याकरिता चांगली आहे असे ठरवून दरबारातील बिरबलाचा हेवा करणारी अमीर-उमराव व मुत्सद्दी मंडळी बादशहाला म्हणाली, ''ज्या तानसेनच्या अंगी ही श्रेष्ठ गायन-विद्या आहे, त्याची योग्यता वास्तविक बिरबलाहूनही अधिक आहे. म्हणून बिरबलाच्या जागी वजीर म्हणून तानसेनास नेमण्यात आले तर ते अधिक चांगले होईल.''

यावर बादशहा त्यांना म्हणाला, ''तानसेन गायनविद्येत कितीही प्रवीण असला तरी बिरबलाच्या अंगच्या अनेक गुणांपुढे त्याचा हा गुण व्यर्थ आहे, या गोष्टीची थोड्याच दिवसात तुम्हाला प्रचीति पाहावयास मिळेल.

नंतर दुसऱ्या दिवशी बादशहाने बिरबल व तानसेन या दोघासही बोलावून आणले व त्यांच्या हाती एक मोहोरबंद पत्र देऊन ते पत्र घेऊन त्यांनी रूस देशाच्या बादशहाकडे जावे व त्या पत्राचे उत्तर घेऊन परत यावे, अशी त्यास आज्ञा केली. त्या पत्रांत काय मजकूर लिहिला आहे, हे त्या दोघांनाही



बादशहाने सांगितले नाही. बादशहाच्या आज्ञेप्रमाणे बिरबल व तानसेन ते पत्र घेऊन रूस देशाला गेले व एक दिवस दरबारात जाऊन त्या देशाच्या बादशहाला त्यांनी ते पत्र सादर केले. ते पत्र वाचताच बादशहाने आपल्या सेवकास आज्ञा केली की, या दोघास शहराबाहेरील मैदानात न्या व तेथे त्यांचा शिरच्छेद करा. कारण अकबराने रूस देशाच्या बादशहाला लिहिलेल्या पत्रात ''हे पत्र घेऊन येणाऱ्या दोघा माणसांचा शिरच्छेद करावा'' असाच मजकूर लिहिला होता.

नंतर रूस देशाच्या बादशहाची आज्ञा अमलात आणण्याकरिता त्याचे सेवक त्या दोघांचा शिरच्छेद करण्याकरिता त्यांना गावाबाहेर घेऊन चालले असता, तानसेन भयभीत होऊन रडू लागला. त्यावेळी बिरबल त्याला म्हणाला, आता रडून काय उपयोग? तू माझ्यापासून गुणांनी श्रेष्ठ आहेस व त्याकरता माझे वजीरपद तुला देण्यात यावे, असे तुझे पक्षपाती लोक बादशहाला सांगू लागले, म्हणून बादशहाने तुझ्या व माझ्या

अंगच्या गुणांची परीक्षा पाहाण्याकरिता ही गोष्ट मुद्दाम घडवून आणली आहे. तरी तू आता आपल्या गायनविद्येच्या गुणाच्या जोरावर या संकटाचे निवारण करून दाखव." यावर तानसेनाने बिरबलाच्या पायांवर लोटांगण घातले व त्याचे श्रेष्ठत्व कबूल करून आपले या संकटातून प्राण वाचविण्याबद्दल तो त्याची प्रार्थना करू लागला. नंतर बिरबलाने तानसेनास धीर दिला व या संकटातून पार पडण्याकरिता कसे वागायचे याबद्दल त्याला एक युक्ती सांगितली.

काही वेळाने ते वधस्थानाजवळ येऊन पोहोचले. तेव्हा बिरबल पुढे होऊन आनंदी मुद्रेने "माझा आधी शिरच्छेद करा" असे त्या राजसेवकास म्हणाला. तोच तानसेन - त्याला आधीच बिरबलने पटवून ठेवले होते त्याचप्रमाणे, बिरबलास बाजूला सारून - "माझा आधी शिरच्छेद करा" अशी त्या राजसेवकांना विनंती करू लागला. त्या दोघांचे हे चमत्कारिक वर्तन पाहिल्यावर त्या राजसेवकास मोठेच गूढ पडले. प्रत्यक्ष जीव गमावण्याचा प्रसंग आलेला असताना हे दोघे ज्याअर्थी आनंदी वृत्तीने एकमेकास मागे सारून अगोदर शिरच्छेद करवून घेण्याबद्दल भांडताहेत त्याअर्थी हा आश्चर्यकारक प्रकार आधी बादशहास कळवून, नंतर त्यांना ठार करणे शहाणपणाचे आहे असे त्या राजसेवकांनी ठरवले व त्या दोघांस बरोबर घेऊन ते पुन्हा दरबारात गेले व घडलेली सर्व हकिकत त्यांनी बादशहास निवेदन केली. ती ऐकून बादशहालाही फार आश्चर्य वाटले व त्याने त्या दोघास प्रश्न केला, "तुम्ही दोघेही एकमेकांना मागे सारून आधी मरण्याबद्दल भांडताहात याचे कारण काय ते सांगा पाहू!" यावर बिरबलाने उत्तर केले, "आम्ही दोघेही

अकबर बादशहाचे मोठे विश्वासू सेवक आहोत. तुम्ही जी गोष्ट विचारता ती आम्ही तुम्हाला सांगितली तर आमच्याकडून स्वामीद्रोह घडेल. तरी त्या गोष्टीबद्दल अधिक पृच्छा न करता अकबर बादशहाने आमचा शिरच्छेद करण्याचे, आपल्यावर सोपविलेले काम लवकर पार पाडावे; पण कृपा करून आधी मला मारावे मग या तानसेनला मरू द्या!'' बिरबलाच्या शब्दांनी तर रूसचा बादशहा अधिकच बुचकळ्यात पडला व त्या दोघांना म्हणाला, ''जर तुम्ही विचारलेली गोष्ट सांगणार नसाल, तर मी मुळी तुमचा शिरच्छेदच करायला तयार नाही.'' यावर बिरबल फार घाबरून गेल्याचे सोंग करून बादशहाला बोलला, ''महाराज, आमचा शिरच्छेद केला नाही व आम्ही जिवंत राहून आमच्या बादशहाकडे परत गेलो, तर आमच्या बादशहाचा आमच्यावर मोठाच रोष होईल. पण आपला आग्रहच असला तर आपण विचारता ती गोष्ट सांगतो. मात्र आमचा शिरच्छेद करण्याचे आधी वचन दिले पाहिजे.''

बिरबल व तानसेन जी गोष्ट सांगायला तयार नव्हते, ती कळून घेण्याबद्दल बादशहा इतका उत्कंठित झाला होता की, त्याने लगेच बिरबलला तसे वचन दिले. नंतर बिरबल रूसच्या बादशहाला म्हणाला, ''महाराज, आपल्याला माहीत असेलच की, फार दिससांपासून आमच्या अकबर बादशहाच्या मनात आपले हे राज्य जिंकावे असे आहे; पण आपण स्वतः फार शूर असल्यामुळे आपल्या राज्यावर स्वारी करण्याचा आमच्या बादशहाला हिय्या करवला नाही. पण अलीकडेच अकबर बादशहाचे गुरू मक्केहून दिल्लीला आले होते. त्यांनी अकबराला असे सांगितले की, रूस देशाचा बादशहा मोठा पुण्यशील

आहे. सबब त्याचे राज्य टिकून राहिले आहे. पण त्याच्या हातून दोन निरपराध माणसे जर मारली जातील तर त्याचे ते पुण्य नष्ट होईल व तो तात्काळ मरण पावेल. तसेच त्याच्या हातून ही जी दोन माणसे मारली जातील त्यांपैकी जो पहिल्यांदा मरेल त्याला पुनर्जन्मी या रूस देशाचे राज्यपद मिळेल. आम्हा दोघांवर आमच्या बादशहाचा अतिशय लोभ असल्यामुळे या अशा महत्त्वाच्या कामावर त्याने आम्हा दोघांची योजना केली आहे. तरी आता आपले वचन पूर्ण करा; मात्र आधी माझा शिरच्छेद करा व मग या तानसेनचा.''

बिरबलाने सांगितलेली ही हकिकत ऐकून रूसच्या बादशहाला फार संताप आला व तो म्हणाला, ''तुमचा अकबर बादशहा इतका कपटी आहे, हे मला माहीत नव्हते. तुमचा शिरच्छेद करण्याचे जरी मी वचन दिले असले; तरी ते वचन मी आता मुळीच पाळणार नाही. वचनभंगाचे पाप पुरवले, पण स्वतः आपण होऊन मी माझ्या स्वतःच्या व माझ्या राज्याच्या नाशाला कारण होणार नाही.''

नंतर ''तुम्ही लिहिलेले काम आम्हाला करता येत नाही.'' असा अकबराच्या पत्राला जबाब लिहून तो रूसच्या बादशहाने त्या दोघांकडे दिला व त्यांना दिल्लीला परत जाण्यास सांगितले.

यावर बिरबल व तानसेन या दोघांनी रूसच्या बादशहाच्या या वचनभंगामुळे आपल्याला फारच दुःख झाल्याची बतावणी केली व ते त्याच्या दरबारातून निघाले.

काही दिवसांनी दिल्लीला पोहोचल्यावर रूसच्या बादशहाने दिलेला जबाब त्यांनी अकबराकडे आणून दिला. तो जबाब वाचून ''तुम्ही जिवंतपणे परत कसे आलात?'' असा बादशहाने

तानसेनास प्रश्न केला. तेव्हा तानसेनाने दरबारातल्या सर्व लोकांसमक्ष रूस देशात घडलेला प्रकार बादशहाला निवेदन करून ''बिरबलाच्या अचाट बुद्धिचातुर्यामुळेच आम्हा दोघांचे प्राण वाचले!'' अशी कबुली दिली.


नंतर बिरबलाचा हेवा करणाऱ्या दरबारातल्या मंडळींना बादशहा म्हणाला, ''बिरबल व तानसेन या दोघांमध्ये श्रेष्ठ कोण हे आता तुम्हीच सांगा.''

बादशहाचे हे शब्द ऐकून दरबारातील सर्व लोक अगदी खजील होऊन गेले.

●

९ : बूंदसे गई सो हौदसे नहीं आती !

एकदा बादशहाने आपल्या जन्मदिवसानिमित्त दरबारातल्या अमीर-उमरावांना एक थाटाची मेजवानी दिली. त्या प्रसंगी



मेजवानीनंतर बराच वेळ गाणे बजावणे झाल्यावर बैठक बरखास्त होण्यापूर्वी बादशहाचे नोकर मेजवानीस आलेल्या लोकास विडे, हार, तुरे तसेच गुलाबपाणी व उंची सुवासिक अत्तरे देऊ लागले. इतक्यात बादशहाजवळ असलेल्या अत्तरदाणीतील एक थेंब खाली पडलेला बादशहास दिसून आला व तो चटकन पुसून अत्तरदाणीत भरण्याकरिता बादशहा तो थेंब बोटाने घ्यावयास लागला; परंतु तो तात्काळ बिछायतीत जिरून जाऊन हाती लागला नाही. बादशहाच्या ध्यानात येताच तो ओशाळला. दुसऱ्या दिवशी बादशहाने एक पाण्याचा हौद रिकामा करवून तो अत्तराने भरविला आणि दरबारातल्या सर्व लोकांना बोलावून त्यांजकडून तो लुटविला. या लुटीची मौज दाखविण्याच्या मिषाने बादशहा बिरबलास बरोबर घेऊन त्या हौदाजवळ आला व बिरबलास म्हणाला, ''क्यों बिरबल, कैसी मजा है?'' बिरबल म्हणाला, ''खुदावंत, तकसीर माफ होना, लेकिन बूंदसे गई, सो हौदसे नहीं आती!'' थेंबाने गेलेली अब्रू हौदाने परत कशी येणार? अशा अर्थाचा बिरबलाचा हा टोमणा ऐकून हौदभर अत्तराचा खर्च फुकट गेला या विचाराने बादशहाच्या मनास फार खंत वाटली!

१० : काठीची वाढ

दिल्ली शहरातल्या एका सावकाराचा एक भारी किमतीचा हार एकदा चोरीस गेला. या चोरीसंबंधीची फिर्याद त्या सावकाराने बादशहाकडे आणली. आपण स्नानास गेलो असता गळ्यातील हार काढून आपण जवळच्या खुंटीवर ठेवला, पण

स्नान करून उठल्यावर तो हार पुन्हा गळ्यात घालावा म्हणून खुंटीवरून घ्यायला गेलो, तो तेथून तो नाहीसा झाल्याचे आढळून आले, अशी या चोरीची हकिकत त्याने बादशहाला सांगितली. ती ऐकल्यावर हार चोरणारा चोर कसा शोधून काढावा, याबद्दल बादशहा बुचकळ्यात पडला व त्याने बादशहाला सांगितली. ती ऐकल्यावर हार चोरणारा चोर कसा शोधून काढावा, याबद्दल बादशहा बुचकळ्यात पडला व त्याने चोराचा छडा लावण्याचे हे काम बिरबलाकडे सोपविले.

हा हार सावकाराच्या एखाद्या नोकरानेच चोरला असला पाहिजे हे बिरबलाच्या ध्यानात आले व त्याने सावकाराच्या घरातील सर्व नोकरांना आपल्यासमोर बोलावून आणून त्यांच्याकडे या हारासंबंधी चौकशी केली. पण त्यांच्यापैकी कोणीच आपण हार चोरल्याचे कबूल करेना. शेवटी बिरबलाने त्या नोकरांपैकी प्रत्येकाजवळ सारख्या लांबीची एकेक काठी देऊन त्यास सांगितले की, "ही काठी घेऊन प्रत्येकाने घरी जावे व रात्रभर ती स्वतःकडे ठेवून दुसरे दिवशी ती मजकडे घेऊन यावी. ज्याने हार चोरला असेल त्याची काठी चार बोटे लांब वाढेल."

नंतर ते सर्व नोकर घरी गेल्यावर ज्याने हार चोरला होता, त्याला अशी भीती वाटली की, बिरबलाने सांगितल्याप्रमाणे आपली काठी चार बोटे वाढली, तर आपली चोरी उघडकीला येईल, म्हणून त्याने आपली काठी गुपचूप चार बोटे कापून लहान केली.

दुसऱ्या दिवशी ते सर्व नोकर आपापल्या काठ्या घेऊन बिरबलापुढे हजर झाले. बिरबलाने त्या सर्वांच्या काठ्या

तपासल्या व त्यांपैकी एकाची काठी चार बोटे तोकडी झालेली पाहून त्यानेच चोरी केली आहे ही गोष्ट ओळखली. त्या नोकरास सेवकांकडून खरपूस मार देवविल्यावर त्यानेही मग आपली चोरी कबूल केली व चोरलेला हार लपवून ठेवला होता, तो आणून सावकाराच्या हवाली केला.

●

११ : गुलाम व त्याचा मालक

एकदा एका दूर देशाचा मनुष्य आपल्या एका गुलाम नोकरास बरोबर घेऊन प्रवासास निघाला. प्रवास करता करता ते दोघेही दिल्ली शहरात आले व तेथे त्यांनी काही दिवस मुक्काम केला. दिल्ली शहरात राहत असता हा गुलाम आपल्या मालकाला सोडून पळून गेला. पुढे काही दिवसांनी त्याची व त्याच्या मालकाची दिल्ली शहरातील एका रस्त्यात अचानक गाठ पडली. पण तो गुलाम एवढा हिकमती होता की, आपला मालक आपल्याला पकडील हे पाहताच त्याने आपल्या मालकाचाच अंगरखा घट्ट पकडला व त्याला तो म्हणू लागला, ''अरे लबाड गुलामा, मी तुझा मालक असताना मला सोडून पळालास काय? आता बरा सापडलास! मुकाट्याने घरी चल! नाहीतर तुला कोतवाल - चावडीवर नेईन!'' यावर त्या गुलामाचे व त्याच्या मालकाचे मोठेच भांडण जुंपले. दिल्ली शहरात ते दोघेही अनोळखी असल्यामुळे त्यातला मालक कोण व गुलाम कोण, याबद्दल साक्ष देणारा त्या शहरात कोणीच नव्हते. शेवटी हे भांडण बादशहाकडे आले व बादशहालाही या



भांडणाचा निर्णय लावता न आल्यामुळे त्याने हे प्रकरण निवाड्यासाठी बिरबलाकडे सोपविले.

बिरबलाने त्या दोघांचेही म्हणणे ऐकून घेतल्यावर थोडा वेळ विचार केल्यासारखे दाखवले. नंतर त्या दोघास एका खिडकीपाशी उभे करून दोघांनाही खिडकीबाहेर डोकी काढण्यास सांगितले व नोकराच्या हाती तलवार देऊन तो नोकर व बिरबल खिडकीच्या बाहेर जाऊन उभे राहिले. मग बिरबलाने त्या नोकरास हुकूम केला की, ''गुलामाचे डोके उडव !'' हे शब्द ऐकल्याबरोबर जो खरोखरी गुलाम होता त्याने आपले डोके भिऊन एकदम आत घेतले. त्यावर गुलाम कोण व मालक कोण, हे बिरबलाने बरोबर ओळखले व त्या लबाड गुलामाला मालकाच्या हवाली केले.

●

१२ : गरीब शेतकऱ्यास बक्षीस मिळवून दिले

एकदा अत्यंत कडक थंडी पडली असता बादशहाने आपल्या दरबारातल्या लोकांना विचारले, ''अशा थंडीत सबंध रात्रभर बागेतल्या हौदात कोणी उभा राहील का?''

तेव्हा दरबारातला एक इसम म्हणाला, ''जर मोठे बक्षीस लावले, तर त्या बक्षिसाच्या आशेने एखादा गरीब मनुष्य अशारीतीने हौदात उभा राहील.''

तेव्हा बादशहाने दवंडी पिटवून असे बक्षीस जाहीर केले. मोठे बक्षीस मिळणार, या लोभाने बरीच माणसे रात्रभर होदात उभी रहावयास तयार झाली, पण एक-दोन तासाहून अधिक वेळ त्यांच्यापैकी एकालाही त्या हौदात रहावले नाही. शेवटी एका खेड्यातून आलेला एक तरुण शेतकरी मात्र सबंध रात्र हौदात राहण्यात यशस्वी झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याला बादशहापुढे बक्षीस घेण्याकरिता नेण्यात आले, पण या एका खेडवळ माणसाला बादशहाकडून एवढे मोठे बक्षीस मिळणार हे पाहिल्यावर काही मत्सरी माणसांच्या पोटात दुखू लागले व त्यांनी नसत्या शंका काढायला सुरुवात केली. त्यांतला एकजण म्हणाला, ''राजवाड्यापुढे जे शेकडो दिवे जळत होते; त्या दिव्यांच्या उष्णतेमुळे हा शेतकरी पाण्यात उभा राहू शकला.''

हे ऐकल्यावर बादशहाचे मन फिरले व त्याने त्या शेतकऱ्याला बक्षीस न देता परत पाठविले.

ही गोष्ट घडली त्यावेळी बिरबल दिल्लीत नव्हता. तो परत आल्यावर तो शेतकरी त्याला भेटला व दरबारातल्या



दुष्ट लोकांनी आपल्याला बक्षिसाला मुकवले ही गोष्ट त्याने बिरबलाला सांगितली. तेव्हा त्या गरीब शेतकऱ्याला ते बक्षीस मिळवून दिले पाहिजे असे बिरबलाने ठरविले.

बिरबल दिल्ली शहरात आला आहे ही गोष्ट कळल्यावर बादशहाकडून त्यास बोलावणे आले. बिरबलाने बादशहाला उत्तर पाठविले, ''खिचडी पकवून येतो'' व पुरुषभर उंचीची एक काठी उभी करून तिला त्याने एक खिचडीचे पातेले बांधले व त्याखाली जमिनीवर तो सनकडी पेटवीत बसला.

बादशहाने नंतर दर तासा दोन तासांनी आणखी दोनतीनदा बिरबलाला बोलावणे पाठविले, पण प्रत्येक खेपेला बिरबलाने ''खिचडी पकवून येतो'' हेच उत्तर पाठवले. शेवटी बादशहा कंटाळला व बिरबल एवढा वेळ खरेच खिचडी पकवतो आहे की काय, हे पाहाण्याकरिता स्वतःच बिरबलाकडे आला. तेथे बिरबलाची खिचडी पकविण्याची पद्धत पाहून बादशहा हसून

म्हणाला, अरे, अशाने सबंध दिवसात तरी खिचडी पकवून होईल का व ती तुला खायला मिळेल का?''

तेव्हा बिरबलाने उत्तर केले, ''सरकार, जर लांबच्या दिव्यांनी हौदात उभ्या असलेल्या माणसाला उष्णता मिळते, तर खालच्या या सनकडीच्या विस्तवाने इतक्या जवळची खिचडी का शिजणार नाही?''

बिरबलाचे हे उत्तर ऐकल्यावर जाहीर केलेले बक्षीस त्या शेतकऱ्यास न देऊन त्याच्याबाबतील आपण कसा अन्याय केला, ही गोष्ट बादशहाच्या लक्षात आली व त्याने त्या शेतकऱ्याला बोलावणे पाठवून त्याला ठरवलेले बक्षीस देऊन टाकले.

●

१३ : झक मारणे!

एक दिवस बादशहा बिरबलास बरोबर घेऊन नदीकिनाऱ्यावर फिरत असता त्यास काही कोळी लोक तेथे मासे पकडीत असलेले दिसले. त्यावेळी त्या लोकांप्रमाणे आपणही मासे पकडावे, असे बादशहास वाटले व एका काठीला गळ लावून तो त्या किनाऱ्यावर मासे पकडीत बसला. इतक्यात बादशहाने सांगितलेल्या एका निकडीच्या कामाची बिरबलास आठवण झाल्यावरून ते करण्याकरिता बादशहाची रजा घेऊन बिरबल राजवाड्यात परत आला. तो एकटाच परत आलेला पाहून त्याला राणीने विचारले, ''बादशहा कोठे आहेत ?''

बिरबलाने उत्तर दिले. ''बादशहा झक मारीत आहेत!''

बिरबलाच्या या उत्तराचा राणीला फार राग आला व काही वेळाने बादशहा राजवाड्यात परत आल्यावर तिने ही गोष्ट त्याच्या कानावर घातली. बिरबल अलीकडे फार शेफारत चालला आहे. खुद्द बादशहा संबंधीसुद्धा त्याच्या तोंडून अशी बेमुर्वतपणाची भाषा निघते, तेव्हा त्यास एकदा कडक शिक्षा बादशहाने केली पाहिजे, असे राणीचे म्हणणे पडले व ते बादशहासही बरोबर वाटून त्याने लगेच बिरबलास राजवाड्यात बोलावून आणले. बिरबल आल्यावर बादशहा संतापाच्या भरात त्यास बोलला, ''बिरबल, तू अलीकडे उद्दामपणे वागू लागला आहेस! मघाशी राणीने माझी चौकशी केली असता ''बादशहा झक मारीत आहेत'' असे उद्धटपणाचे उद्‌गार तुझ्या तोंडून निघाले, हे खरे ना ?''

यावर बिरबलाने उत्तर केले, ''महाराज, अपराधाची क्षमा असावी. राणीसाहेबांकडे मी जे बोललो त्यात काही खोटे नव्हते. कारण, आपण त्यावेळी मासे मारण्यात गुंतला होता आणि 'झक' या शब्दाचा अर्थ मासा असा आहे.''

बिरबलाचे हे समर्पक उत्तर ऐकून राणी व बादशहा यांचा त्याच्यावरचा राग नाहीसा झाला.

●

१४ : दोन गाढवांचे ओझे

एक दिवस बादशहा व राणी बिरबलास बरोबर घेऊन नदीवर स्नानास गेली. तेथे बादशहा व राणी यांनी आपले कपडे काढून बिरबलास दिले व नंतर ती दोघेही नदीत स्नानास उतरली. स्नान आटोपून किनाऱ्यावर आल्यावर त्यांचे कपडे

खांद्यावर घेऊन उभ्या असलेल्या बिरबलाची कुचेष्टा करण्याकरिता त्याला उद्देशून बादशहा म्हणाला, "बिरबल, तुझ्याजवळ ह्या कपड्यांचे एका गाढवाचे ओझे झाले!"



यावर बिरबलाने लगेच उत्तर दिले, 'सरकार, एका गाढवाचे नव्हे; दोन गाढवांचे ओझे माझ्या खांद्यावर आहे!' बिरबलाचा हा टोमणा ऐकून बादशहा खजील झाला.

●

१५ : राख व सब्जा

एक फकीर व एक बैरागी असे दोघेजण एकदा बादशहाच्या दरबारात आले. फकिराने आपल्या झोळीतून सबजीची पाने काढून बादशहाला दिली. तेव्हा बादशहा खूष झाला व त्या फकिरास शंभर मोहोरा देण्याचा त्याने हुकूम केला. त्यानंतर बैराग्याने आपल्या झोळीत हात घालून चिमूटभर

राख काढली व ती बादशहास दिली, पण बैराग्याने आपणास राख दिलेली पाहून बादशहाला क्रोध आला व त्या बैराग्यास तुरुंगात टाकण्याचा त्याने हुकूम दिला. हे पाहिल्यावर बादशहाजवळ बसलेला बिरबल म्हणाला ''सरकार, बैराग्यास तुरुंगाची शिक्षा व त्या फकिरास शंभर मोहोरांचे इनाम - हा अगदी उलटा न्याय झाला!''

''ते कसे? म्हणून बादशहाने विचारल्यावर बिरबलाने उत्तर दिले, ''वास्तविक पाहता त्या फकिराने तुम्हांस ''सब्जा'' दिला. म्हणजे तुमचे सर्व जावो - गादी जावो, धन जावो असा त्याचा अर्थ होतो. उलट बैराग्याने ''राख'' दिली म्हणजेच धन राख, गादी राख, सर्व राख असा त्याचा अर्थ होतो!''

हे ऐकल्यावर बैराग्यावरचा बादशहाचा राग नाहीसा झाला व त्यासही इनाम देण्याचा त्याने हुकूम दिला.

●

१६ : स्वर्ग व नरक !

एक दिवस बादशहाने बिरबलास विचारले, ''स्वर्गवास कोणाला भोगावा लागतो, नरकवास कोणाला भोगावा लागतो, हे सांगा पाहू?''

बिरबलाने उत्तर केले, ''ज्या माणसांना ती मेल्यावर लोक बरे म्हणतात, त्यांना स्वर्गवास लाभला असे समजावे व ज्यांना मेल्यावर वाईट म्हणतात ती माणसे नरकवास भोगतात, असे समजावे.''

बिरबलाचे हे शहाणपणाचे उत्तर ऐकून बादशहा खूष झाला.

●

१७ : शहाणा कोण व मूर्ख कोण?

बादशहाने एके दिवशी बिरबलास विचारले, ''या जगात शहाणा कोणास म्हणावे व मूर्ख कोणास म्हणावे हे सांग पाहू?''

बिरबलाने चटकन उत्तर दिले, ''ज्याची मसलत शेवटास गेली त्यास या जगात शहाणा म्हणावे व ज्याची फसली त्यास मूर्ख म्हणावे.''

●

१८ : सर्वांच्या मनातला हेतू

एक दिवस दरबार भरल्यावर तेथे बसलेल्या अमीर-उमरावांपैकी प्रत्येकाला बादशहाने प्रश्न केला, ''या दरबारात बसलेल्या तुम्हा सर्वांच्या मनात काय आहे ते एकाच उत्तरात सांगा!''

हा प्रश्न त्या अमीर-उमरावांना इतका अवघड वाटला की, ते सर्वजण बुचकळ्यात पडले व त्यांपैकी कोणालाही या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. शेवटी बादशहाने तोच प्रश्न बिरबलास केला, तेव्हा बिरबलाने चटकन उत्तर केले, ''महाराज, आपली ही गादी सुरक्षित असावी, आपली कीर्ती धनदौलत, राज्य यांची नेहमी वाढ व्हावी'' असे या सर्वांच्या मनात आहे. हे खोटे असल्यास यांच्यापैकी प्रत्येकाला विचारून पाहावे.''

बादशहाची गादी सुरक्षित असू नये, त्याची कीर्ती, धनदौलत, राज्य यांची वाढ होऊ नये असे आपणास वाटते म्हणणारा त्या दरबारात कोणीही असणे शक्य नव्हते !

अर्थात त्या दरबारी लोकांना बिरबलाने बादशहाच्या प्रश्नाला दिलेले उत्तर बरोबर आहे, असे कबूल करावे लागले व त्यामुळे बादशहा बिरबलावर खूष झाला.

●

१९ : बहुरूप्यावर मरण ओढवले

दिल्ली शहरात एक काजी होता. त्याला बादशहाच्या दरबारात बिरबलाचा होत असलेला उत्कर्ष पाहावत नसे व म्हणून तो बिरबलाचा नेहमी द्वेष करी. कोणत्या ना कोणत्या युक्तीने बिरबलास ठार करावे असा या काजीने निश्चय केला व बादशहाची परवानगी घेऊन तो प्रवासाला म्हणून निघाला. नंतर दोन वर्षे देशातरी जाऊन तेथे राहिल्यावर बहुरूप्याच्या वेषाने दिल्ली शहरात परत येऊन त्याने आपल्या सोंगांनी दिल्ली शहरातल्या सर्व लोकांकडून वाहवा मिळविली. थोड्या दिवसांनी त्याची ख्याती बादशहाच्या कानावर गेली व बादशहाने त्याला बोलावून आणून विचारले, ''तुझ्या सर्व सोंगामध्ये उत्कृष्ट वाटणारे सोंग कोणते?''

बहुरूपी म्हणाला, ''सर्व सोंगामध्ये उत्तम वाटणारे सोंग म्हणजे वाघाचे सोंग. मात्र ते हुबेहूब वठलेले आपल्याला पाहायचे असेल तर मी ते वठवताना एखाद्या माणसास इजा झाली तर त्याबद्दल आपण मला माफी केली पाहिजे. कदाचित इजा होणारा तो मनुष्य मरण पावला तर त्याबद्दलही मला शिक्षा होता कामा नये. असे असेल तर हे माझे सोंग मी आपली आज्ञा होईल त्या दिवशी करून दाखवीन.''



या बहुरूप्याचे हे म्हणणे बादशहाने मान्य केले व त्याचे हे सोंग पाहण्याकरिता एक दिवस मुक्रर केला. या ठरलेल्या दिवशी हे वाघाचे सोंग पाहण्याकरिता दरबारातल्या इतर अमीर-उमरावांबरोबर बिरबलालाही मुद्दाम पत्र पाठवून बादशहाने राजवाड्यात पाचारण केले. वाघाचे सोंग पाहण्याकरिता बादशहाने आपल्याला बोलावले आहे असे पाहताच बिरबलाला जरा संशय आला व म्हणून हे सोंग पाहण्याकरिता जायचे त्या दिवशी अंगात कपड्याखाली एक पोलादी चिलखत घालून तो राजवाड्यात गेला.

बादशहा व सगळे अमीर-उमराव येऊन दाखल झाल्यावर बहुरूप्याने आपले सोंग दाखविण्यास सुरुवात केली. हुबेहूब वाघाचे रुप धारण करून तो प्रेक्षकांपुढे आला व वाघाप्रमाणे भयंकर गर्जना करीत त्याने काही कृती करून दाखवल्या. नंतर

एकाएकी चवताळल्यासारखे करून एक डरकाळी फोडून नेमकी बिरबलावर झेप घेतली. त्यावर बिरबलाने वरकरणी भ्यायल्यासारखे करून एक किंकाळी फोडली. बादशहा व इतर प्रेक्षक यांना यावेळी वाटले की, बिरबल आता या बहुरूप्याच्या हातून खचित ठार होतो! पण आश्चर्यची गोष्ट ही की तो बहुरूपी आपल्या पंजाचे एकसारखे तडाखे बिरबलावर हाणीत होता, त्याचप्रमाणे आपल्या भयंकर तोंडाने त्याच्या अंगाचे लचके तोडण्याचा प्रयत्न करीत होता, तरी बिरबलाच्या अंगातून रक्ताचा थेंबही बाहेर आला नाही. बिरबलाने आपल्या अंगात पोलादी चिलखत घातले आहे ही गोष्ट शेवटी बहुरूप्याच्या लक्षात आली व शरमून जाऊन बिरबलाला ठार करण्याचा अधिक प्रयत्न न करता त्याने आपले वाघाचे सोंग संपवले व आपले खरे रूप प्रगट केले. त्यावेळी इतरांबरोबर बिरबलानेही त्याच्या सोंगाडेपणाची तारीफ केली.

त्या बहुरूप्याच्या सोंगावर खूष झालेल्या बादशहाने त्यास काय बक्षीस द्यावे असे बिरबलास विचारले. बिरबल म्हणाला, ''सरकार, हा बहुरूपी आपल्या कलेमध्ये इतका हुषार आहे की, त्यास तसेच काहीतरी मोठे बक्षीस मिळणे जरूर आहे. त्याने उद्या सतीच्या सोंगाची बतावणी करून दाखवावी, म्हणजे मी माझी वजिराची जागा खाली करेन व ती वर्षभर आपण या बहुरूप्यास द्यावी.'' यावर बादशहाने ''सतीचे सोंग करून दाखवशील का?'' म्हणून विचारल्यानंतर तो बहुरूपी म्हणाला, ''खाविंदांच्या इच्छेप्रमाणे मी सतीचे सोंग जरून करून दाखवीन. ते सोंग मला नामी वठवता येते.'' एक वर्ष वजिरी मिळाली तर त्या अवधीत आपल्या अधिकाराच्या जोरावर आपल्याला

बिरबलाचा कायमचा काटा काढता येईल, अशा विचाराने बहुरूप्याने अशारीतीने सतीचे सोंग करून दाखविण्याचे कबूल केले.

तेव्हा बादशहाने, ''जर तू सतीचे सोंग हुबेहूब वठवून बिरबलास खूष केलेस, तर त्याची वजिराची जागा एक वर्षभर बक्षीस म्हणून तुला देईन, पण त्या सोंगात जर तुझ्याकडून काही कमतरता झाली तर तुला मरणाची शिक्षा भोगावी लागेल.'' असे त्यास बजावून दुसऱ्या दिवशी त्या सोंगाकरिता राजवाड्यात हजर राहण्याची त्यास आज्ञा केली.

दुसऱ्या दिवशी बहुरूपी राजवाड्यात आला व हुबेहूब सतीचा वेष घेऊन तो प्रेक्षकांसमोर आला, तेव्हा बिरलाने आधीच तेथे एक अग्निकुंड पेटवून ठेवले होते. ते त्यास दाखवले व त्यात प्रवेश करून दाखविण्यास त्यास सांगितले. ते अग्निकुंड पाहताच बहुरूप्याच्या छातीत धस्स् झाले. सतीच्या या सोंगामुळे आपणास खरोखरीच अग्निकुंडात शिरावे लागेल, हे त्याच्या अगोदर लक्षात आले नव्हते. अग्निकुंडात उडी टाकल्याशिवाय आपल्या सोंगाची संपूर्ण बतावणी होत नाही व ती बतावणी योग्यरीतीने वठवली नाही, तर राजाने आधीच बजावल्याप्रमाणे मरणाची शिक्षा भोगावी लागेल, हे पाहिल्यावर अग्निकुंडात उडी घेऊन आपल्या कौशल्याची प्रख्याती करून घेणे हेच ठीक, असे ठरवून त्या बहुरूप्याने अग्निकुंडात उडी घेतली, तोच बिरबलाने आपल्या सेवकांकरवी त्याला अग्निकुंडातून बाहेर काढवले. अग्निकुंडात जळून मरण्याऐवजी, आगीने अंग थोडेसे भाजण्यावर बहुरूप्यावर आलेले हे संकट निभावले. नंतर बिरबलाच्या या कनवाळूपणामुळे मनात खजील होऊन

कृतज्ञबुद्धीने आपला सर्व खरा वृतात त्या बहुरूप्याने बादशहाला कथन केला व बिरबलाबद्दल इतका काळ मनात दुष्टपणा वागवल्याबद्दल त्याची क्षमा मागितली.

●

२० : झाडाची साक्ष

एक कोष्टी व एक हलवाई यांची फार मैत्री होती. एकदा कोष्टी यात्रेला निघाला तेव्हा त्याने आपले पाचशे रुपये त्या हलवाई मित्राजवळ ठेव म्हणून ठेवायला दिले. काही महिन्यांनी जेव्हा तो कोष्टी यात्रेहून परत आला व त्या हलवायाजवळ जाऊन आपली ठेव मागू लागला, तेव्हा त्याची ठेव आपल्याजवळ आहे ही गोष्ट त्या हलवायाने साफ नाकबूल केली. त्यावर त्या कोष्ट्याने दरबारात येऊन याबाबतीत बिरबलापुढे आपली फिर्याद दाखल केली.

बिरबलाने त्या हलवायाला बोलावून आणून त्यास या बाबतीत काय खरे आहे, ते सांगण्यास सांगितले. हलवाई म्हणाला, ''या कोष्ट्याने यात्रेला निघण्यापूर्वी माझ्याकडे ठेव ठेवली होती, ही गोष्ट साफ खोटी आहे.'' यावर कोष्टी म्हणाला, ''महाराज, हा हलवाई माझा पुष्कळ दिवसांचा मित्र म्हणून विश्वासाने याजकडे मी माझी ठेव ठेवायला दिली. पण आता हा खोटे बोलत आहे.'' बिरबलाने नंतर त्या कोष्ट्याला विचारले, ''या हलवायाजवळ तू रक्कम ठेवायला दिलीस या गोष्टीला कोणी साक्षीदार आहे काय?'' कोष्ट्याने उत्तर दिले, ''महाराज, साक्षी वगैरे कोणी नाही, तरीपण एका आंब्याच्या झाडाखाली मी याच्याजवळ पाचशे रुपये दिले ही गोष्ट अगदी खरी आहे,''

कोष्ट्याचे हे शब्द ऐकल्यावर बिरबल त्याला म्हणाला, ''आंब्याच्या झाडाखाली जर तू या हलवायाजवळ पैसे दिलेस, तर या गोष्टीला कोणी साक्षी नाही असे तू कसे म्हणतोस? ते झाड साक्ष आहे. जा हा कागदावर लिहिलेला माझा हुकूम नेऊन त्या झाडास दे, म्हणजे ते येथे येऊन साक्ष देईल.'' असे म्हणून बिरबलाने एका कागदावर झाडाला उद्देशून आपला हुकूम लिहिला व तो कोष्ट्याकडे दिला.

कोष्ट्याला बिरबलाच्या कृतीचे आश्चर्य वाटले, पण त्याच्या मुर्वतीखातर तो लेखी हुकूम घेऊन तो त्या झाडाकडे जायला निघाला. थोड्या वेळाने बिरबलाने उतावीळ झाल्यासारखे दाखवून मागे राहिलेल्या त्या हलवायाला म्हटले, ''कोष्टी अजून कसा आला नाही? ते झाड फार दूर आहे का?'' तेव्हा तो हलवाई चटकन बोलून गेला, ''महाराज, तो कोष्टी अजून अर्ध्या रस्त्यावरही पोहोचला नसेल, कारण ते झाड गावाबाहेर बऱ्याच अंतरावर आहे. त्याला तेथून परत यायला निदान आणखी अर्धा तास तरी लागेल.'' जवळजवळ अर्ध्या तासाने तो कोष्टी परत आला व बिरबलास म्हणाला, ''त्या झाडाला आपला हुकूम नेऊन दिला, पण ते काही बोलत चालत नाही म्हणून मी परत आलो.'' तेव्हा बिरबल बोलला, ''तुझ्या पाठीमागे झाड येथे येऊन काय खरा प्रकार आहे ते सांगून परत गेले.'' यावर हलवाई एकदम चिडून म्हणाला, ''महाराज, हे काय तुम्ही भलतेच सांगता ? एवढा वेळ मी येथेच बसून आहे. झाड साक्ष द्यायला आले असते तर मला दिसले नसते का?''

नंतर बिरबलाने त्या हलवायाची त्याच्या खोटेपणाबद्दल

चांगलीच कानउघाडणी केली व त्यास म्हटले, ''झाड जरी येथे प्रत्यक्ष साक्ष द्यायला आले नाही, तरी या सर्व हकिकतीमध्ये झाडाचा जो संबंध आला त्यामुळे खरे काय ते उघडकीस आले व या कोष्ट्याने तुझ्याजवळ ठेव दिली इतकी साक्ष त्या झाडामुळे मिळाली. तुला ते झाड माहीत नसते, तर मी तुला प्रश्न केला तेव्हा ''ते झाड दूर अंतरावर आहे. असे तू कसे बोललास?''

बिरबलाचे हे शब्द ऐकून तो हलवाई निरूत्तर झाला व त्याने आपल्याजवळ कोष्ट्याने ठेव ठेवायला दिली होती ही गोष्ट शेवटी कबूल केली.

●

२१ : निमकहलाल व निमकहराम

एक दिवस बादशहाने बिरबलास प्रश्न केला, ''या जगात सर्वांत निमकहलाल कोण व सर्वांत निमकहराम कोण, हे सांग पाहू?

बिरबल म्हणाला, ''सरकार, या जगात खरा निमकहलाल कोण असेल तर तो कुत्रा; कारण त्यास तुम्ही खायला घाला किंवा उपाशी ठेवा, तो आपल्या धन्याची चाकरी करण्यात कधीही चुकत नाही. उलट जगात निमकहराम कोण असेल तर तो जावई होय. कारण त्याला किती दिले, तरी त्याचे समाधान होत नाही व जर कधी चुकून त्याची बडदास्त ठेवण्यात एक काडीभर कमी झाले, तर तो सासुरवाडीच्या सर्व मंडळींची निंदा करीत सुटेल. म्हणूनच ''जामातः कृष्णसर्पश्च पावको

दुर्जनस्तथा । उपकार न जानानि पंचमो भगिनीसुतः ।। या वचनामध्ये जावयाचा सर्वांत आधी उल्लेख केला आहे.''

बिरबलाच्या या चतुर उत्तराने बादशहा खूष झाला.

•

२२ : सोन्याचा सूळ

वरील गोष्टीत बिरबलाने सांगितल्याप्रमाणे ''जावई हा जगात सर्वांत जास्त निमकहराम'' असे ठरल्यावर बादशहाच्या मनात असा विचार आला की, अशी निमकहराम माणसे जगातून नाहीशी करून टाकावी. सबब त्याने बिरबलाला आज्ञा केली की, ''आपल्या राज्यातील सर्व जावयांना एकदम सुळी द्यावे.''

बिरबलाने बादशहाच्या या आज्ञेप्रमाणे आठ दिवसात सर्व जावयास सुळी देण्याचे कबूल केले. नंतर त्याने शहराबाहेरील एका पटांगणात चार-पाच हजार सूळ रोवून ठेवले. त्यापैकी एक सूळ सोन्याचा, एक रूप्याचा, शंभर तांब्याचे व बाकीचे लोखंडाचे होते.

नंतर सुळी देण्याच्या ठरलेल्या दिवसाच्या एक दिवस अगोदर बिरबल बादशहाला घेऊन त्या पटांगणात गेला व जावयांना सुळी देण्यासाठी केलेली तयारी त्याला दाखवू लागला.

त्या ठिकाणी सोन्याचा, रूप्याचा, तांब्याचे व लोखंडाचे असे निरनिराळ्या धातूंचे सूळ पाहून बादशहाला आश्चर्य वाटले व त्याने बिरबलास विचारले, ''अरे, हा सोन्याचा सूळ कोणा करता ?'' बिरबल हात जोडून म्हणाला, ''खाविंद,



अपराधाची क्षमा असावी! हा सोन्याचा सूळ आपल्याकरिता आहे, कारण आपणही आपल्या सासऱ्याचे जावई आहात. तसेच मी आपला वजीर असल्यामुळे व मीही माझ्या सासऱ्याचा जावई असल्यामुळे हा रूप्याचा सूळ माझ्याकरिता आहे. बाकीचे ज्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणे केले आहेत.''

बिरबलाचे उत्तर ऐकून बादशहाला आपली चूक कळून येऊन तो खजील झाला व त्याने आपला हुकूम रद्द केला.

●

२३ : बिरबल बुद्धीने श्रेष्ठ

बादशहाने बिरबलाला आपले मुख्य प्रधानपद दिले होते, त्यामुळे इतर प्रधान त्याचा हेवा करीत. एक दिवस बिरबलाचा हेवा करणारे इतर प्रधान बादशहाला म्हणाले, ''सरकार,

आपण बिरबलाला उगीच मुख्य प्रधानपद दिले आहे. वास्तविक आम्हा इतर प्रधानांहून तो कोणत्याही बाबतीत श्रेष्ठ नाही.''

यावर बादशहा त्यांना म्हणाला, ''बिरबल तुम्हा सर्वांहून कोणत्या बाबतीत श्रेष्ठ आहे, या गोष्टीचा एखादे दिवशी तुम्हाला उलगडा होईल.'' नंतर काही दिवसांनी बादशहा सर्व प्रधानांना व बिरबलाला घेऊन यमुनेच्या वाळवंटावर गेला व तेथल्या ओल्या वाळूवर आपल्या काठीने एक रेघ ओढून त्या सर्वांस तो म्हणाला, ''मी वाळूवर ओढलेल्या या रेघेला स्पर्श न करता ही लहान करून दाखवा पाहू!''

यावर बिरबलाचा हेवा करणाऱ्या त्या सर्व प्रधानांनी बराच वेळ आपले डोके खाजवले, पण बादशहाची ती रेघ त्या रेघेला स्पर्श न करता लहान कशी करून दाखवावी हे त्यांना काही सुचेना. तेव्हा सर्वांनी याबाबत आपली बुद्धी चालत नाही ही गोष्ट कबूल केली. शेवटी बादशहाने बिरबलाला विचारले, ''या रेघेला स्पर्श न करता, ही तुला लहान करून दाखवता येईल काय?''

''त्यात एवढे काय कठीण आहे?'' असे उत्तर देऊन बिरबलाने बादशहाने ओढलेल्या रेघेशेजारी तिच्याहून मोठी अशी एक रेघ ओढली व तो म्हणाला, ''सरकार, आता आपण ओढलेली रेघ लहान झाली.''

मूळच्या रेघेला स्पर्श न करता बिरबलाने ती रेघ अशारीतीने लहान करून दाखविली, ही गोष्ट बादशहाला व इतर सर्व प्रधानांना आता कबूल करावी लागली.

नंतर बादशहा त्या प्रधानांना म्हणाला, ''तुम्हा सर्वांच्या बुद्धीहून बिरबलाची बुद्धी कशी श्रेष्ठ आहे, हे आजच्या या

प्रसंगावरून सिद्ध झाले आहे. तरी तुम्ही बिरबलाचा उगाच हेवादावा करणे सोडून त्याचे श्रेष्ठत्त्व मान्य करावे, यातच शहाणपणा आहे.''

●

२४ : बादशहाचा बेगमांवरचा राग गेला

एकदा बादशहा शिकारीला गेला असता तेथे त्याला एक आश्चर्यकारक गोष्ट दिसून आली. शिकार करीत असता थकून जाऊन बादशहा एका ओढ्याच्या काठी विसावा घेत बसला होता. इतक्यात त्या बाजूने जाणारी एक भिल्लीण थोड्या अंतरावर असलेल्या एका झाडाखाली थांबली व तेथे प्रसूत झाली. ती प्रसूत होऊन थोडा वेळ गेल्यावर तिने नुकतेच जन्माला आलेले आपले ते मूल पाठीशी बांधले व लगेच ती आपल्या मार्गाला लागली.



ही गोष्ट पाहिल्यावर बादशहाच्या मनात आपल्या बेगमांना प्रसूतीच्या वेळी पाचदहा हकीम व दहावीस सुईणी कशाला लागतात; असा विचार आला व आपल्या बेगमांबद्दल त्याच्या मनात तिरस्कार उत्पन्न झाला.

दुसऱ्या दिवशी शिकारीहून परत आल्यावर बादशहाने आपल्या बेगमांना बोलावून त्यांच्यावर यथेच्छ तोंडसुख घेतले व रागाने त्यांच्या महालातच जाणे त्या दिवसापासून सोडून दिले.

बादशहाची आपल्यावर अशारीतीने गैरमर्जी झालेली पाहून सर्व बेगमा काळजीत पडल्या. त्यांनी ही गोष्ट बिरबलाला कळविली. बिरबलाने त्या बेगमांना धीर दिला व ''तुम्ही काही काळजी करू नका. बादशहाचा तुमच्यावरील राग जाईल अशी मी व्यवस्था करतो'' असे त्यांना सांगितले.

नंतर बिरबलाने राजवाड्याच्या माळ्याला बोलावून आणले व दुसऱ्या दिवसापासून राजवाड्याच्या बागेतल्या फुलझाडांना अजिबात पाणी शिंपायचे नाही, असा त्यास हुकूम केला.

माळ्याने बिरबलाच्या हुकमाप्रमाणे करताच तीन चार दिवसात राजवाड्यातला सबंध बगिचा सुकून गेला. ही गोष्ट बादशहाच्या नजरेस पडल्यावर त्याला फार राग आला. चौकशी केल्यावर बादशहाला कळून आले की, बिरबलाच्या हुकमाप्रमाणे बगीच्याला पाणी शिंपणे बंद केले आहे. बिरबलाला बोलावून आणून बादशहाने त्याला या गोष्टीचा जाब विचारला, तेव्हा बिरबल साळसूदपणे म्हणाला, ''सरकार, राजवाड्याच्या बगीचातली ही फुलझाडे लबाड आहेत! त्यांना पाण्याची का

जरूरी लागावी? रानातल्या बाभळींना व बोरांना कोणी शिंपत नाही; तरी त्या टवटवीत असतात, पण आपल्या बगीचातले हे गुलाब व जाई, जुई, चमेली यांची केवढी मिजास पाहा! नुसते चारसहा दिवस पाणी शिंपले नाही, तर लागली ही कोमेजण्याचा धाक घालायला!''

यावर बादशहा बोलला, ''अरे बिरबल, रानातल्या बाभळी त्या बाभळी आणि आपल्या या बागेतले गुलाब ते गुलाब!'' बादशहाच्या या शब्दांना लगेच बिरबलाने उत्तर दिले, ''मग सरकार, भिल्लिणी त्या भिल्लिणी आणि बेगमा त्या बेगमा नाहीत का?''

बिरबलाचा टोमणा ऐकल्यावर बादशहा खजील झाला व बेगमांवरचा राग त्या दिवसापासून त्याने सोडून दिला.

●

२५ : घेणाऱ्याचा हात वर

एक दिवस बादशहा बिरबलास म्हणाला, ''बिरबल, आपण नेहमी असे पाहतो की, देणाऱ्याचा हात वर व घेणाऱ्याचा आत खाली असतो. पण या उलट गोष्ट कधी घडते का?''

बिरबलाने उत्तर दिले, ''सरकार, याच्या उलट गोष्ट तपकीर देण्या-घेण्याच्या वेळी घडते. तपकीर देताना देणाऱ्याचा हात खाली व घेणाऱ्याचा हात वर असतो.''

●

२६ : बादशहाचे चार प्रश्न

एक दिवस बादशहाने बिरबलास विचारले -

१) आता आहे, मग आहे
२) आता नाही, मग नाही
३) आता आहे, मग आहे
४) आता आहे, पण मग नाही

अशा या जगातल्या चार वस्तु कोणत्या त्या सांग पाहू ? आपल्या या विलक्षण प्रश्नांमुळे बिरबल घोटाळ्यात पडेल. त्याला या प्रश्नांचे उत्तर काही देता येणार नाही, असे बादशहास वाटले होते. पण बिरबल या चारही वस्तू दाखवून देण्यास तयार झाला व बादशहाला म्हणाला, ''सरकार, या चारही वस्तू आपल्याला पाहायच्या असल्यास आपण माझ्याबरोबर शहरात आले पाहिजे.''

नंतर बिरबलाने बादशहास एका जटाधारी बैराग्याचे सोंग



देऊन आपण शिष्य त्याचा बनला व ते दोघेही शहरातील धनाढ्य लोकांच्या एका मोहल्यात गेले. तेथे सात्विक वृत्तीबद्दल प्रसिद्ध असलेल्या एका सावकाराच्या घरी जाऊन बिरबल त्यास आशीर्वाद देऊन म्हणाला, ''शेठजी, हे माझे गुरू व मी, चारी धामांची यात्रा करायला निघालो आहोत, पण आमच्यापाशी यात्रा करायला जरूर ते द्रव्य नाही, तरी आमची अडचण आपण दूर कराल, तर आम्हाला यात्रा घडविल्याचे आपल्याला पुण्य लाभेल.''

यावर सावकाराने त्यांची द्रव्याची अडचण दूर करण्याचे मोठ्या खुषीने कबूल केले व आपली तिजोरी उघडून त्यातले एक हजार रुपये तो त्यास देऊ लागला तोच बिरबल त्या सावकारास म्हणाला, ''शेठजी, अशारीतीने द्रव्याची मदत करून आपण जे उपकार करीत आहा, त्याबद्दल उतराई होण्याकरिता आम्हाला एक गोष्ट करू द्या!''

सावकाराने उत्सुकतेने विचारले, ''कोणती?''

यावर बिरबलाने आपल्या पायातला जोडा काढून हातात घेतला व त्या सावकारास तो बोलला, ''महाराज, आपल्या डोक्यावर आम्ही एकेक जोडा मारू व मग आपण एकेक रूपया आम्हास द्यावा!''

बिरबलाच्या तोंडचे हे विलक्षण शब्द ऐकून त्या सावकाराच्या पेढीवरची सर्व नोकरमंडळी रागाने खवळून बिरबलास मारावयास धावली, पण सावकाराने शांतपणे त्या सर्वांस आवरून आपल्या डोक्याचे पागोटे काढले व नम्रपणे बिरबलास म्हटले, ''जर माझ्या या रूपयांचा सत्कारणी खर्च होत असेल तर मी प्रत्येक रूपयाबद्दल डोक्यावर एकेक जोडा

सोसण्यास अवश्य तयार आहे!''

त्या सावकाराची अशारीतीने प्रत्ययास आलेली सत्कर्मनिष्ठा, दानशूरता व मानहानी सोसूनही सत्कार्यात आपले द्रव्य खर्च करण्याची त्याची उत्कट इच्छा, ही पाहून बिरबल हर्षभरित होऊन त्या सावकारास धन्यवाद देत म्हणाला, ''आम्हाला जे काही हवे होते ते मिळाले. आता आपल्या द्रव्याची आम्हाला जरूर नाही.''

नंतर बिरबल बादशहाकडे वळून म्हणाला, ''सरकार, आपली जी पहिली वस्तू ''आता आहे, मग आहे'' ती या सावकाराच्या ठिकाणी आहे, ती पाहून घ्या. ईश्वराने या सावकारस भरपूर संपत्ती व इतर सर्व सुखे दिलेली आहेत. म्हणजे त्याच्याजवळ ''आता'' आहे. त्याचप्रमाणे त्याच्या ठिकाणी भूतदया, परोपकार सत्कर्माची इच्छा हे गुण असल्यामुळे मरणानंतरही या पुरुषाला ईश्वर सौख्यच देणार. म्हणजे त्याच्याजवळ ''मग'' आहे. अर्थात ''आता आहे, मग आहे'' अशी जी आपली पहिली वस्तू ती म्हणजे हा सावकार!''

त्यानंतर बिरबल व बादशहा त्या मोहल्ल्यातून पुढे निघाले तो त्यास एक भिकारी दारोदार भिक्षा मागत असलेला दिसला. ''आपण सर्व ईश्वराची लेकरे आहोत. यास्तव गरिबांविषयी दयाबुद्धी बाळगा व त्यांस मदत करा !'' असे म्हणत तो लोकांकडून अन्न गोळा करीत होता. शेवटी बरेचसे अन्न त्याच्या झोळीत जमा झाल्यावर तो भिकारी गावाबाहेर एका तळ्याकाठी जाऊन ते खाऊ लागला. पाठोपाठ ते दोघे तेथे गेले.

नंतर बिरबल त्या भिकाऱ्याबद्दल म्हणाला, ''आम्ही दोघेही यात्रेला निघालो आहोत. दोन दिवस आमच्या पोटात

अन्नाचा एक कणही गेलेला नाही; तरी आम्हाला नुसता एक चतकोर दे. देव तुझे कल्याण करील!''

वास्तविक त्या भिकाऱ्याजवळ त्याला जरूर त्याहून बरेच अधिक अन्न होते, पण बिरबलाने अनेक प्रकारे त्याची विनवणी केली तरी आपल्याजवळचे एक घासभरही अन्न त्या दोघास देण्यास तो कबूल होईना! तेव्हा बिरबल त्या भिकाऱ्याकडे बोट करून बादशहाला म्हणाला, आता नाही, मग नाही'' ही जी आपली दुसरी वस्तू ती म्हणजे हा भिकारी. कारण याच्याजवळ आता काही नाहीच, पण दयाबुद्धि, परोपकार अशा गुणांना पारख्या झालेल्या या कद्रू माणसाला परलोकातही सुख मिळणार नाही.''

नंतर बिरबल बादशहाला गावाच्या वेशीबाहेर एका झोपडीत राहणाऱ्या साधूकडे घेऊन गेला. अष्टौप्रहर ईश्वरसेवेत घालवणारा व नम्रता, जीवमात्रांविषयी सद्‌भाव हे गुण ज्याच्या ठिकाणी आहेत, असा हा साधू दाखवून बिरबल बादशहाला म्हणाला, ''आपली जी तिसरी वस्तू ''आता नाही, मग आहे'' ती म्हणजे हा साधू. कारण ह्या साधूजवळ आता अन्न, वस्त्र, द्रव्य, लौकिक यांपैकी काही नाही, पण याने आपले सर्व चित्त ईश्वराच्या ठिकाणी लावले असल्यामुळे परलोकात याला सौख्य लाभेल.''

याप्रमाणे बिरबलाने तीन वस्तू दाखवून दिल्यावर बादशहा उत्सुकतेने म्हणाला, ''आता चौथी वस्तू कोणती ती दाखव पाहू!

बिरबलाने उत्तर दिले ती वस्तू आपल्याजवळच आहे!''

बिरबलाच्या या शब्दावर बादशहाने बराच वेळ विचार

केला पण त्याला त्या शब्दाचा काहीच उमज पडेना.

तेव्हा शेवटी बिरबल बादशहाला बोलला, ''सरकार, आपल्या पूर्वजन्मीच्या पुण्याईमुळे आपल्या सुखामध्ये सध्या कोणतीही कमतरता नाही. परंतु मग म्हणजे परलोकी काय, याचा आपण विचार केला आहे का! या जन्मी यथान्याय वागून आपण प्रजेला सुखी केले व आपल्या हातून सत्कृत्ये घडली तरच परलोकी आपल्याला सौख्य लाभेल. नाहीतर, ''आता आहे, पण मग नाही!'' अशी आपली स्थिति झाल्यावाचून राहणार नाही!''

बिरबलाने अशारीतीने बादशहाच्या प्रश्नांना समर्पक उत्तर शोभेल अशा चारही वस्तू दाखवून दिलेल्या पाहून बादशहा फार खूष झाला व असा बुद्धिमान व आपल्याला सन्मार्ग दाखविणारा मनुष्य आपल्या दरबारी आहे याबद्दल त्याला धन्यता वाटली.

●

२७ : उंटाची मान

बिरबलाच्या बुद्धिचातुर्यावर खूष होऊन बादशहाने त्यास ''राजा'' ही बहुमानाची पदवी दिली होती व या पदवीला साजेशी एक जहागीरही त्यास बहाल करण्याचे कबूल केले होते. पण बिरबलाचा हेवादावा करणाऱ्या इतर दरबारी लोकांच्या कारवाईमुळे बादशहाकडून ती जहागीरी बराच काळपर्यंत बिरबलाच्या पदरात पडली नव्हती. एकदा या जहागिरीची गोष्ट बिरबलाने बादशहाकडे काढली असता बादशहाने उत्तर देण्याचे टाळण्याकरिता फक्त आपली मान वळविली. बिरबलाने

हा प्रसंग पक्का ध्यानात ठेवला.

पुढे एक दिवस बादशहा बिरबलाला बरोबर घेऊन सहल करण्याकरिता निघाला असता वाटेत एक उंटाचा तांडा जाताना त्यांना दिसला. त्यातील एका उंटाची वाकडी मान पाहून बादशहाने बिरबलास विचारले, "बिरबल, या उंटाची मान अशी वाकडी का रे?"

बिरबलाने लगेच उत्तर दिले, "सरकार, त्याने बहुधा कुणाला तरी जहागीर देण्याचे कबूल करून त्याला फसविले असेल."

बिरबलाचे हे शब्द ऐकताच बादशहाला आपल्या वचनाची आठवण होऊन तो खजील झाला व त्याच दिवशी भर दरबारात बिरबलास जहागिरीची सनद करून देऊन त्याने आपले वचन पुरे केले.

●

२८ : नोकर कोणाचा ?

एक दिवस बादशहा सहज बोलता बिरबलास म्हणाला, "बिरबल, वांग्याची भाजी फार चांगली लागते नाही?"

बिरबलाने उत्तर केले, "अगदी खरे आहे सरकार! म्हणून तर वांग्याची भाजी सगळे लोक इतक्या आवडीने खातात."

काही दिवस गेल्यावर बिरबलाची परीक्षा पाहण्याकरिता बादशहा त्याला पुन्हा म्हणाला, "बिरबल वांग्याची भाजी रूचीला फार वाईट असते, खरे की नाही?"

बिरबलाने उत्तर केले, "होय सरकार! वांग्याची भाजी खरोखरच फार वाईट! ती खाल्याने पोटात रोग होतो."

त्यावर बादशहा त्याला छेडण्याकरिता बोलला, ''किती लबाड बोलतोस तू? थोड्या दिवसांपूर्वी वांग्याची भाजी फार चांगली असे तूच म्हणाला होतास आणि आज म्हणतोस की, वांग्याची भाजी फार वाईट, ती खाल्याने पोटात रोग होतो?''

यावर बिरबल म्हणाला, ''सरकार, मी नोकर कुणाचा? आपला की वांग्याचा?'' बिरबलाचे हे मार्मिक उत्तर ऐकल्यावर बादशहा खजील झाला.

●

२९ : चार मूर्ख

एकदा बादशहाने बिरबलास फर्माविले की, एकाहून एक असे चार मूर्ख मला पाहावयाचे आहेत. त्यांचा शोध लावून ते मला दाखव!'' तेव्हा हिंडता हिंडता एके ठिकाणी हातात मेवामिठाईने व लहानलहान मौल्यवान कपड्यांनी भरलेले चांदीचे तबक घेऊन घाईघाईने जात असलेला एक इसम त्यांना दिसला. बिरबलाने त्याला त्याच्या घाईचे कारण विचारताच तो म्हणाला, ''माझ्या बेगमेने दुसरा नवरा केल्यावर तिला आता मुलगा झाला आहे. सबब मीं हा बाळंतविडा घेऊन जाण्याच्या घाईत आहे !''

त्यावर बिरबल बादशहाला म्हणाला, ''तुम्हाला हव्या असलेल्या चार मूर्खांपैकी हा एक पहिला मूर्ख!''

नंतर बादशहा व बिरबल तेथून पुढे गेल्यावर त्यांना एक मनुष्य आपल्या घोडीवर बसून आपल्या स्वतःच्या डोक्यावर गवताचा भारा घेऊन चाललेला दिसला. त्या माणसाला बिरबलाने थांबवून प्रश्न केला, ''अरे, तू आपल्या घोडीवर



स्वार झालेला असताना हा गवताचा भारा घोडीवर न लादता स्वतःच्या डोक्यावर का नेत आहेस?'' त्या माणसाने उत्तर केले, ''महाराज, माझी घोडी आहे गाभण. तिला तिच्या भाराबरोबर गवताचाही भारा वहावा लागू नये म्हणून हा भारा मी माझ्या डोक्यावर वाहून नेत आहे.''

त्याचे हे उत्तर ऐकल्यावर बिरबल बादशहाकडे वळून म्हणाला, ''हा घ्या, तुम्हाला हव्या असलेल्या चार मूर्खांपैकी दुसरा मूर्ख!''

अशारीतीने दोन मूर्ख दाखवून दिल्यावर बिरबल बादशहाला म्हणाला, ''पण अजून आणखी दोन मूर्ख तू दाखवायचे राहिले आहेत.''

''त्या राहिलेल्या दोन मूर्खांचा शोध लावायला फार दूर जायला नको. या मूर्खांना शोधीत हिंडणारा तिसरा मूर्ख मी व ''यांना शोधून आणा'' असे सांगणारे चौथे मूर्ख आपण!'' हे बिरबलाचे उत्तर ऐकून बादशहा खजील झाला !

●

३० : एकाच अपराधाला निरनिराळ्या शिक्षा!

एकदा राजसेवकांनी तीन गुन्हेगारांना पकडून आणून बादशहासमोर उभे केले. त्या दिवशी बादशहा बिरबलाला म्हणाला, ''आज माझ्याऐवजी तुम्हीच या तिघांचा फैसला करा.''

यावर बिरबलाने त्या तिघा गुन्हेगारांची चौकशी केल्यावर त्याला कळून आले की, त्या तिघांनीही मिळून एकच गुन्हा केला आहे. नंतर त्या तिघांकडे थोडा वेळ नीट न्याहाळून पाहिल्यावर बिरबलाने पहिल्या गुन्हेगाराला म्हटले, 'तू हे अत्यंत वाईट कृत्य केलेस! जा, येथून आपले तोंड काळे कर!'

दुसऱ्या अपराध्याला दोन फटक्यांची शिक्षा त्याने फर्माविली आणि तिसऱ्याची मात्र शहरभर गाढवावरून धिंड काढली.

दरबार आटोपल्यावर बादशहाने बिरबलास प्रश्न केला, ''बिरबल, या तिघांनीही एकच अपराध केला असताना त्यांना तू कमीअधिक स्वरूपाच्या निरनिराळ्या शिक्षा फर्माविल्यास, याचे कारण काय?'' यावर बिरबलाने उत्तर केले, ''सरकार, याचे कारण आपल्याला समजून घ्यायचे असल्यास, त्या तिघांही गुन्हेगारांची पुढची माहिती मागवा, म्हणजे त्यावरून आपल्याला सर्व काही कळेल.''

बिरबलाच्या सांगण्याप्रमाणे बादशहाने आपल्या सेवकांकडून त्या तिघांची माहिती आणवली तेव्हा बादशहास कळून आले की, ज्या पहिल्या गुन्हेगारास बिरबलाने नुसते कानउघाडणीचे शब्द उच्चारून सोडून दिले होते, त्यास त्या

शब्दांमुळे एवढे दुःख वाटले की, त्या दुःखाच्या भरात यमुनेच्या पाण्यात आत्महत्या करण्याचा त्याने प्रयत्न केला होता. पण एका कोळ्याने ऐनवेळी त्याचा जीव बचावून त्याला त्याच्या घरच्या मंडळींच्या स्वाधीन केले. दुसऱ्या गुन्हेगाराने दोन फटक्यांची शिक्षा भोगल्यावर एवढी धास्ती खाल्ली की, त्याने भयाने देशत्याग केला होता व ज्या तिसऱ्या गुन्हेगाराला सर्वांत जास्त कडक शिक्षा झाली होती, तो इतका निरगट्ट होता की, तो शिक्षा भोगून सुटल्यावर त्याने पुन्हा आणखी एखादे वाईट कृत्य करायची तयारी चालवली होती.

त्या तिघांचे नुसते चेहरे पाहून बिरबलाने त्यांच्या वेगवेगळ्या स्वभावाची पारख केली होती व तदनुसार त्यांना कमीअधिक स्वरूपाच्या शिक्षा फर्माविल्या होत्या. बिरबलाचे या बाबतीतले चातुर्य आता बादशहाला चांगल्या रीतीने कळून आले.

●

३१ : मेंढीचे वजन

एकदा बादशहाने आपल्या दरबारातल्या लोकांच्या बुद्धीची परीक्षा घेण्याचे ठरविले. त्याकरिता आपल्या सर्व प्रधानांना व सरदारांना राजवाड्यात बोलावून त्यांपैकी प्रत्येकाला एक एक मेंढी वजन करून दिली व म्हटले, ''तुमच्यापैकी प्रत्येकाने आपापली मेंढी घरी घेऊन जावी व एका महिन्यानंतर येथे दरबारात ती मेंढी परत आणून द्यावी. ज्याच्या मेंढीचे वजन कमी किंवा जास्त झालेले आढळून येईल त्याला शिक्षा दिली जाईल.''



बादशहाचा हा चमत्कारिक हुकूम ऐकून त्या सर्व दरबारी लोकांची घाबरगुंडी उडाली. कारण मेंढीचे वजन कमी किंवा जास्त न होईल, याबद्दल काय खबरदारी घ्यावी हे त्यांना कळेना.

शेवटी एक महिन्याच्या मुदतीनंतर ठरेलल्या दिवशी त्या सर्वांनी आपापल्या मेंढ्या आणून बादशहापुढे हजर केल्या. त्या सर्व मेंढ्यांचे वजन बादशहाने करविले. तेव्हा फक्त बिरबलाच्या मेंढीशिवाय इतरांच्या मेंढ्यांचे वजन पूर्वीहून कमी किंवा जास्त झालेले आढळून आले.

बिरबलाच्या मेंढीचे वजन बरोबर एका महिन्यापूर्वी होते तेवढेच पाहून बादशहाने विचारले, ''बिरबल, मेंढीचे वजन कमी - जास्त होऊ नये म्हणून तू काय युक्ती केलीस, ती सांग पाहू!''

''सरकार, या मेंढीला दिवसभर यथेच्छ चारायचे व

रात्री हिच्यापुढे एक वाघ बांधून ठेवायचा, असा मी एक महिनाभर क्रम चालवला होता!'' बिरबलाने उत्तर दिले.

यावर बादशहाने बिरबलाच्या अकलेची तारीफ केली व खूष होऊन त्यास मोठे बक्षीस दिले.

●

३२. सर्वांत महत्त्वाचे पान

एक दिवस बादशहाने दरबारातल्या लोकांना प्रश्न केला, ''या दुनियेत इतकी झाडे आहेत, त्यात कुठल्या झाडाचे पान सर्वांत महत्त्वाचे?'' दरबारातल्या प्रत्येक माणसाने आपल्या आवडीचे पान महत्त्वाचे म्हणून सांगितले. पण त्यापैकी एकाच्याही उत्तराने बादशहाचे समाधान झाले नाही. शेवटी बिरबलाने दिलेले उत्तर ऐकून मात्र बादशहा खूष झाला. बिरबल म्हणाला, ''विड्याचे म्हणजे नागवेलीचे पान सर्वांत महत्त्वाचे कारण तेवढे एकच पान माणसाचे तोंड रंगवते व त्यास शोभा आणते.''

●

३३ : एरंडीचे तेल !

एकदा एका परदेशी राजाने बिरबलास आपल्या राजधानीत पाहुणा म्हणून काही दिवस रहावयाला बोलावले. अकबर बादशहाची परवानगी घेऊन बिरबलाने या राजाचे ते निमंत्रण स्वीकारले व तो त्या राजाच्या राजवाड्यात राहत असता राजवाड्यात एका संडासात अकबर बादशहाची तसबीर लावलेली दिसून आली. अकबर बादशहाने आपल्या

पराक्रमाच्या जोरावर निरनिराळे देश जिंकून आपले राज्य वाढविले होते. या गोष्टीचा त्या राजाला हेवा वाटे व म्हणून अकबर बादशहाला कमीपणा आणण्याच्या हेतूने त्या राजाने ही गोष्ट केली होती, हे बिरबलाच्या लक्षात आले. नंतर एक दिवस त्या राजाशी गप्पागोष्टी करीत असता बिरबल त्यास म्हणाला, ''राजेसाहेब, आपण आमच्या अकबर बादशहाची तसबीर संडासात लावली आहे, यात आपले मोठेच चातुर्य व्यक्त होते!''

बिरबलाचे ते शब्द ऐकून त्या राजाने आश्चर्याने बिरबलाला विचारले, ''हे कसे?''

''अहो, संडासात गेल्यावर ती तसबीर दिसताच आपणास एरंडीचे तेल घेतल्यानंतरचा अनुभव येत असला पाहिजे, म्हणून ती तसबीर तेथे लावण्याची योजकता आपण दाखवली आहे!''

बिरबलाचे हे उत्तर ऐकून तो राजा फार खजील झाला.

●

३४ : पेटी बोलली

एकदा एका सावकाराच्या पेटीतील एक मौल्यवान हिरा चोरीस गेला. तो हिरा चोरल्याचा ज्याच्यावर वहीम होता, त्या इसमास शिपायांनी बादशहापुढे आणून उभे केले. बादशहाने नंतर सावकाराची ती पेटीही तेथे आणवण्याचा हुकूम दिला. ती पेटी शिपायांनी आणून बादशहापुढे ठेवल्यावर बादशहा त्या पेटीकडे व ज्याच्यावर चोरीचा वहीम होता त्या इसमाकडे बोट करून बिरबलास म्हणाला, ''या पेटीतला हिरा चोरल्याचा या इसमावर वहीम आहे, तरी याचा नीट शोध लाव पाहू!''



''सरकार, या बाबतीत खरे-खोटे काय ते ती पेटीच सांगेल!'' असे म्हणून बिरबलाने त्या पेटीस आपले कान लावले व थोडे ऐकल्यासारखे करून बिरबल चोरीचा शोध लावल्याच्या आविर्भावाने बादशहाकडे वळून बोलला, ''पेटी सांगते की, चोराची दाढी तेवढी दूर केली तर त्याच्या गळ्यातच तो हिरा सापडेल!''

बिरबलाचे हे शब्द ऐकताच ज्याच्यावर चोरीचा वहीम होता, त्याने घाबरून आपली दाढी जास्तीच फेंदारली. तेव्हा बिरबलाने ताबडतोब त्याचा गळा पकडून त्याची दाढी दूर केली, तो खरोखरच तो चोरीला गेलेला हिरा त्याच्या दाढीखाली सापडला.

हे पाहिल्यावर बादशहाने बिरबलाच्या चातुर्याची तारीफ केली व त्या चोरास शिक्षा ठोठावली.

●

३५ : दोघांची स्वप्ने

एकदा पाहाटेच्या वेळेस बिरबल काही कामानिमित्त बादशहास भेटावयास गेला त्यावेळी नुकताच झोपेतून उठलेला बादशहा बिरबलाची कुचेष्टा करण्याकरिता म्हणाला, ''बिरबल, मला काल रात्री स्वप्न पडले की, मी एका मधाच्या हौदात पडलो आहे व तू एका चिखलाच्या रबडीत पडला आहेस!''

बादशहाचे हे शब्द ऐकल्यावर बिरबलाने लगेच उत्तर दिले, ''सरकार, काय चमत्कार सांगावा? रात्री मलाही नेमके हेच स्वप्न पडले. मात्र त्या स्वप्नात मी असे पाहिले की मी तुम्हाला व तुम्ही मला चाटीत होता!''

बिरबल मध चाटीत होता व आपण चिखल चाटीत होतो, असा बिरबलाच्या या उत्तराचा अर्थ होतो हे लक्षात आल्यावर बादशहा खजील झाला.

●

३६ : तुपातील मोहोर

तुपाचा व्यापार करणारे दोघे व्यापारी होते. त्यापैकी एकाने दुसऱ्यास एकदा पाचशे रुपये उसनवार दिले होते. पुढे पहिल्या व्यापाऱ्याने त्या दुसऱ्या व्यापाऱ्याकडे उसनवार दिलेली रक्कम मागितल्यावर तो दुसरा व्यापारी आपण रक्कम घेतली होती, ही गोष्टच नाकबूल करू लागला. तेव्हा ज्याने रक्कम उसनवार दिली होती, तो बिरबलाकडे, त्या दुसऱ्या व्यापाऱ्याविरुद्ध फिर्याद घेऊन आला. त्या दोघांपैकी कोणाचे म्हणणे खरे हे ठरविणे फार कठीण गोष्ट होती म्हणून त्या



दोघांसही बिरबलाने त्या दिवशी परत जायला सांगितले.

काही दिवसांनी बिरबलाने शहरातील सर्व तुपाच्या व्यापाऱ्यांना आपल्या कचेरीत बोलावून आणणे. त्या व्यापाऱ्यांमध्ये पाचशे रुपये रकमेच्या बाबतीत फिर्यादी व आरोपी म्हणून थोड्या दिवसांपूर्वी त्याच्याकडे आलेले ते दोघे व्यापारीही होते. नंतर त्या सर्व व्यापाऱ्यांपैकी प्रत्येकाकडे एक एक डबा देऊन बिरबल त्यास म्हणाला, ''हे सर्व डबे दहा दहा शेर तुपाचे आहेत, हे घरी घेऊन जा व यातल्या तुपाची नीट पारख करून हे परत घेऊन या, व येत्या बाजाराच्या दिवशी या तुपाचा काय भाव येईल ते मला सांगा.''

त्या व्यापाऱ्यांपैकी जे दोघे फिर्यादी व आरोपी होते, त्यांच्या डब्यांमध्ये बिरबलाने तुपाखाली एकेक मोहोर टाकून ठेवली होती. बिरबलाच्या सांगण्याप्रमाणे सर्व व्यापारी आपापले

डबे घेऊन घरी गेले व त्या डब्यातील तूप कढवून व पारखून त्याचे भाव ठरविल्यावर ठरवलेल्या दिवशी ते डबे घेऊन बिरबलापुढे हजर झाले. अर्थात फिर्यादी व आरोपी यांना तूप कढवीत असता त्यात एकेक मोहोर दिसली. त्यातला प्रामाणिक व्यापारी, जो फिर्यादी, त्याने ती मोहोर बिरबलाकडे परत केली, पण आरोपी व्यापारी हा लबाड असल्यामुळे त्याने ती मोहोर मुलाकडे ठेवायला दिली.

बिरबलाने त्या आरोपी व्यापाऱ्याच्या डब्यातील तूप तोलून पाहिले, तो ते कमी झालेले दिसले. ते कमी होण्याचे कारण विचारता तो व्यापारी म्हणाला, ''कढवताना वाफून कमी आले असेल.''

नंतर बिरबल आतल्या खोलीत गेला व त्याने ''कालची मोहोर घेऊन तुला तुझ्या वडिलांनी बोलाविले आहे.'' असा निरोप देऊन एका नोकराला त्या आरोपी व्यापाऱ्याच्या घरी त्याच्या मुलाकडे पाठवले. मुलगा ती मोहोर घेऊन बिरबलाच्या कचेरीत आला. त्याला पाहताक्षणीच बिरबलाने त्यास प्रश्न केला, ''अरे त्या डब्यातल्या चारही मोहोरा आणल्यास ना?'' त्या मुलाने चटकन उत्तर दिले, ''चार कुठल्या?'' एकच होती; ती ही पाहा, आणली आहे.''

अशारीतीने त्या आरोपी व्यापाऱ्याची लबाडी मुद्देमालानिशी त्याच्या पदरात घातल्यावर बिरबल त्यास म्हणाला, ''प्रत्यक्ष माझ्याशी एका मोहोरेकरिता तू ही लबाडी केलीस! मग तू त्या व्यापाऱ्याचे पाचशे रुपये लुबाडण्याकरिता कितीही खोटे बोलायला कमी करणार नाहीस! यानंतर त्या आरोपीने आरोप कबूल केला व त्या दुसऱ्या व्यापाऱ्याचे पाचशे रुपये परत केले.

३७ : बाकी शून्य !

एक दिवस बादशहाने दरबारातील लोकास प्रश्न केला, सत्ताविसांतून नऊ काढले तर बाकी काय राहील?''

प्रत्येकाने उत्तर दिले, ''बाकी अठरा राहतील.''

त्यावेळी बिरबल दरबारात आला नव्हता. थोड्या वेळाने तो दरबारात आला तेव्हा त्यालाही बादशहाने हाच प्रश्न केला.

बिरबलाने चटकन उत्तर दिले, ''बाकी शून्य! कारण सत्तावीस नक्षत्रांतून पावसाची नऊ नक्षत्रे वगळली तर बाकी काय रहाणार आहे?''

बिरबलाने दिलेल्या या उत्तरातील चातुर्य पाहून बादशहा खूष झाला.

•

३८ : अकबरी भारत

एक दिवस बादशहा बिरबलास म्हणाला, ''प्राचीन काळी या हस्तिनापुरीत पांडव राज्य करीत होते. त्याच नगरीमध्ये आज मी राजा आहे. पांडव जसे पराक्रमी होते तसाच मीही पराक्रमी आहे. महाभारत या तुमच्या ग्रंथामध्ये पांडवांसंबंधी जसा कथाभाग आला आहे, तसा माझ्यासंबंधी कथाभाग रचून एक नवे भारत तयार कर.''

''जी सरकार!'' बिरबलाने उत्तर केले व हे नवे अकबरी भारत रचण्याकरिता म्हणून खर्चासाठी बादशहाकडून दहा हजार रुपये व चार महिन्यांची मुदत मागून घेतली.

नंतर चार महिने गेल्यावर बिरबलाने कागदाची २० -

२५ रिमे ग्रंथासारखी दिसतील अशारीतीने गाढवावर घालून बादशहाकडे आणली व तो बादशहाला म्हणाला, "सरकार, आपले भारत तयार झालेले हे दाखवायला आणले आहे. पण त्यात थोडासा कथाभाग अजून घालायचा राहिला आहे!"

बादशहाने उत्सुकतेने विचारले, "तो कोणता?"

"पांडवांच्या बायकोस पाच नवरे होते; परंतु आपल्या बेगमसाहेबास तर आपण एकच माहीत आहात, तेव्हा इतर चौघांची नावे समजली म्हणजे तेवढा कथाभाग घालून हा ग्रंथ पुरा करता येईल."

हे ऐकल्यावर बादशहाने खजील होऊन झालेला ग्रंथ नदीत नेऊन बुडविण्याची बिरबलास आज्ञा केली.

●

३९ : अकबरी रामायण

बिरबलास आपण आपल्यासंबंधी भारत रचावयास



सांगितले, पण त्यात भलतीच अडचण आल्यामुळे ती आपली इच्छा पुरी झाली नाही, तेव्हा आता आपल्यावर त्यास रामायण रचावयास सांगावे, असा विचार करून बादशहा एक दिवस बिरबलास म्हणाला, ''अकबरी भारत तर होतच नाही, पण अकबरी रामायण होण्यास मात्र बिलकुल अडचण नाही, तर असे रामायण तू रचून दाखवले पाहिजेस!''

बिरबल म्हणाला, ''जशी आपली आज्ञा! बहुधा एक महिन्यात असे रामायण तयार करून आपल्याला दाखवायला आणीन. पण या कामास वीस हजार रुपये खर्च येईल.''

यावर बादशहाने लगेच वीस हजार रुपये बिरबलाच्या स्वाधीन केले व एका महिन्याच्या मुदतीत हे अकबरी रामायण तयार झाले पाहिजे असे त्यास बजावले.

नंतर एका महिन्याने बिरबल एक भले मोठे कागदांचे बाड घेऊन राजवाड्यात गेला. बादशहा व राणी ज्या महालात बोलत बसली होती, तेथे जाऊन ते बाड त्यास दाखवीत म्हणाला, ''बाईसाहेब, सरकारच्या हुकुमाप्रमाणे अकबरी रामायणाचा हा ग्रंथ लिहून तयार आहे. पण त्यात थोडासा कथाभाग अजून घालावयास राहिला आहे. तो कसा लिहावा, हे आपण सांगा.

रामाच्या सीतेस रावणाने पळवून नेले व त्याच्या घरी ती सहा महिने राहिली, असे रामायणात लिहिले आहे. त्याचप्रमाणे आपणास कोणी पळवून नेले होते व त्याच्या घरी आपण किती काळ राहिला होता, हे कृपा करून सांगा, म्हणजे तेवढे कथाभाग या अकबरी रामायणात घालून हा ग्रंथ पुरा करतो.''

बिरबलाचे हे शब्द ऐकल्यावर अकबराच्या राणीस भयंकर

राग आला व रागाच्या भरात तिने बिरबलाचे ते बाड हिसकावून घेऊन जाळून टाकले. अकबरी रामायणाचीसुद्धा अशारीतीने विल्हेवाट लागलेली पाहून बादशहाचा फार हिरमोड झाला.

४० : सोंग ते सोंगच!

एकदा अक़बर बादशहाने काही महत्त्वाच्या कामगिरीवर बिरबलाची रूस देशात रवानगी केली. बिरबलाच्या चातुर्याची ख्याती रूस देशाच्या बादशहाच्या कानावर आधीच जाऊन पोहोचली होती.

तेव्हा आपल्याला भेटायला आलेल्या या अकबर बादशहाच्या वजिराची परीक्षा पाहण्याचे त्या बादशहाने ठरविले. ज्या दिवशी बिरबल त्या बादशहास भेटण्याकरिता त्याच्या दरबारात येणार होता, त्या दिवशी त्याने आपल्या दरबारातील



बारा सरदारांना आपल्यासारखाच पोषाख करून यायला सांगितले. बिरबलाने रूस देशाच्या बादशहाला कधीच पाहिले नव्हते. त्यामुळे राजाला शोभेल असा एकसारखा पोषाख केलेली तेरा माणसे त्या दरबारात पाहताच तो आश्चर्यचकित झाला.

आपल्या बुद्धीची परीक्षा पाहण्याकरिताच रूसच्या बादशहाने मुद्दाम हा प्रकार घडवून आणला असला पाहिजे हे त्याने ताडले. मग त्याने थोडा वेळ बादशहाच्या पोषाखात असलेल्या त्या तेरा जणांवरूनही एकवार नजर फिरविली व त्यांच्यातून बादशहालाच बरोबर ओळखून काढून त्यालाच तेवढा मुजरा केला.

बिरबलाचे हे चातुर्य पाहून बादशहास आश्चर्य वाटले व त्याने बिरबलास प्रश्न केला, ''तुम्ही आम्हाला बरोबर कसे ओळखून काढले?''

बिरबलाने उत्तर केले, ''तुमच्या बाराही सरदारांचे पोषाख तुमच्यासारखेच असले तरी त्यांची दृष्टि तुमच्याकडे होती व तुम्हीच तेवढे निर्धास्त नजरेने सगळीकडे पाहत होता. त्यामुळे मी तुम्हाला बरोबर ओळखू शकलो. कितीही झाले तरी सोंग ते सोंगच!''

हे उत्तर ऐकून बिरबलाच्या चातुर्याची आपण ऐकलेली ख्याती खरी आहे, याबद्दल रूसच्या बादशहाची खात्री झाली व बिरबलाला मोठे बक्षीस देऊन त्या बादशहाने त्याचा गौरव केला.

●

४१ : तीन प्रश्नांना एकच उत्तर

एक दिवस दरबार भरला असता बादशहाने तेथे

असलेल्या अमीर-उमरावांपैकी प्रत्येकाला विचारले,

"विड्याचे पान सडले का?

घोडा अडला का?

आणि भाकरी करपली का?

या तीन प्रश्नांना एकच उत्तर कोणते असल्यास सांगा."

त्या अमीर-उमरावांनी पुष्कळ विचार केला; पण या प्रश्नांना एकच उत्तर कोणते द्यावे हे त्यांना सुचेना. शेवटी बादशहाने बिरबलास विचारल्यावर त्याने लगेच उत्तर दिले, "न फिरवल्याने!"

बिरबलाच्या या उत्तराने बादशहा फार खूष झाला.

४२ : कावळ्यांची शाळा

"बिरबल, आपल्या या दिल्ली शहरात कावळे किती आहेत ते सांग पाहू" बादशहा एक दिवस बिरबलास म्हणाला. बिरबलाने चटकन उत्तर दिले, 'सरकार, आपल्या या शहरातील कावळ्यांची संख्या बरोबर अठरा हजार चारशे छपन्न एवढी आहे."

यावर बादशहाने त्यास प्रश्न केला, "कावळ्यांची ही संख्या कमी जास्त भरली तर?"

बिरबलाने निःशंकपणे उत्तर केले, "मी सांगितली त्याहून कावळ्यांची संख्या कमी जास्त भरणे मुळीच शक्य नाही. कदाचित ती कमी भरल्यास या शहरातले काही कावळे परगावी गेले असतील व जास्त झाल्यास परगावचे कावळे या शहरात

पाहुणे म्हणून आले असतील!''

बिरबलाचे हे हजरजबाबी बोलणे ऐकून बादशहा फार खूष झाला.

●

४३ : हजारावा भाग

एक दिवस बादशहा व बिरबल गप्पागोष्टी करीत बसले असता बादशहा बिरबलाची चेष्टा करण्याकरिता म्हणाला, ''बिरबल, तू आपल्या बायकोचे हात नेहमी पाहतोस, तेव्हा तिच्या हातात किती बांगड्या आहेत, ते सांग पाहू?''

बिरबलाने लगेच उत्तर दिले, ''सरकार, दिवसातून फारच थोडा वेळ बायकोच्या हाताकडे माझी नजर जाते. पण आपली नजर सबंध दिवसभर आपल्या दाढीवरून हलत नाही. तेव्हा आपल्या दाढीचे केस किती आहेत हे आपल्याला माहीत असेलच. आपल्या दाढीचा हजारावा हिस्सा माझ्या बायकोच्या हातात बांगड्या आहेत. यात माझी चूक असल्यास सरकारांनी ती दाखवून द्यावी!'' बिरबलाचे हे शब्द ऐकल्यावर बादशहा निरूत्तर झाला.

●

४४ : गलिच्छ कोण?

एक दिवस बादशहा बिरबलास बरोबर घेऊन शहरात



फेरफटका करायला निघाला असता रस्त्यात एक गाय काही अमंगळ पदार्थ खाताना त्याला दिसली. इतक्यात ती मुतू लागली. तेव्हा त्याच बाजूने जाणाऱ्या एका ब्राम्हणाने ते गोमूत्र घेऊन आपल्या शरीरावर शिंपडले व थोडेसे प्राशनही केले. हे पाहिल्यावर बादशहा बिरबलास म्हणाला, ''जी गाय अमंगळ पदार्थ खाताना आपल्याला दिसली, त्याच गाईचे मूत पिताना या ब्राम्हणाला आपण नुकतेच पाहिले. गाईचे मूत पिणाऱ्या तुम्हा हिंदूंची जात फार गलिच्छ आहे.''

यावर बिरबलाने उत्तर केले, ''सरकारचे म्हणणे खरे आहे. पण तुम्हाला हे माहीत आहे का की, एका ब्राम्हणाचे मूत तुमच्यासह सर्व जग पीत आहे?''

बिरबलाचे हे शब्द ऐकून बादशहाने आश्चर्याने विचारले, ''ते कसे?''

बिरबल म्हणाला, "महाराज, पूर्वी या समुद्राचे पाणी नदीच्या पाण्याप्रमाणे गोड होते. पण प्राचीन काळी अगस्ति नावाच्या एका ब्राम्हणाने ते सर्व पिऊन टाकले. त्यामुळे सर्व प्राणी पाण्यावाचून मरू लागले. नंतर सर्व लोकांनी त्याची प्रार्थना केल्यावर ते त्याने लघवीच्या द्वारे बाहेर सोडले. तेव्हापासून समुद्राचे पाणी खारे झाले अशी आमच्या पुराणात कथा आहे. समुद्रातील पाण्यापासून जे मीठ तयार होते ते खाणारे सर्वजण एकप्रकारे त्या ब्राम्हणाचे मूतच पितात, असे म्हणावयास हरकत नाही."

बिरबलाचे हे उत्तर ऐकून बादशहा चूप बसला.

४५ : थोडी बहुत!

बिरबलाला एक मुलगी होती. ती बिरबलाप्रमाणेच चलाख बुद्धीची होती. ती सात-आठ वर्षांची असताना एकदा बिरबलाबरोबर दरबारात आली. तेव्हा बादशहाने तिला विचारले, "बेटा, तुला आमची भाषा येते की नाही?"

तिने उत्तर दिले, "थोडी बहुत येते."

यावर तिच्या बुद्धीची परीक्षा पाहण्याकरिता बादशहाने तिला पुन्हा प्रश्न केला, "थोडी बहुत म्हणजे काय?"

ती मुलगी लगेच म्हणाली, "ज्यास चांगली येते, त्यांच्यापेक्षा मला थोडी येते आणि ज्यास मुळीच येत नाही, त्यांच्यापेक्षा बहुत येते."

बिरबलाच्या मुलीचा हा हजरबाबीपणा पाहून बादशहा खूष झाला व बक्षिसादाखल तिला त्याने बहुमोलाचा पोषाख दिला.

●

४६ : बेगमची प्रिय वस्तू

एकदा काही कारणाने बदाशहा आपल्या राणीवर फार रागावला व त्या रात्रीच्या आत तिने आपला महाल सोडून तिच्या बापाच्या घरी निघून जावे, अशी त्याने तिला शिक्षा फर्माविली. यावर राणी फार घाबरली व तिने बिरबलाला बोलावून आणून त्याला ही हकिकत सांगितली. बिरबलाने राणीला धीर दिला व बादशहाचा तिच्यावरील राग जाईल, अशी एक युक्ती तिला सांगितली. ती ऐकल्यावर राणीला फार आनंद झाला.

नंतर राणीने, ''माहेरी जाण्यापूर्वी आपल्याला एकदा भेटू द्यावे, अशी माझी विनंती आहे!'' असा आपल्या दासीकरवी बादशहाला निरोप पाठविला. बादशहाने तिची ही विनंती मान्य केल्याचे कळेल्यावर ती बादशहाला जाऊन भेटली व त्याच्याशी अत्यंत अदबीने व प्रेमाने वागून त्याच्याकडून तिने अशी परवानगी मिळविली की, राजवाड्यातून निघण्यापूर्वी तेथली एखादी तिला अत्यंत प्रिय वस्तू बरोबर न्यायला तिला मुभा आहे.

नंतर तिने बादशहाला एका पेल्यातून सरबत प्यावयाला दिले. ते सरबत पिताच बादशहा बेशुद्ध झाला. बेशुद्ध स्थितीत असलेल्या बादशहाला तिने आपल्या मेण्यात घातले व

त्याच्यासह ती आपल्या बापाच्या घरी आली.

दुसऱ्या दिवशी सकाळी बादशहा शुद्धीवर आला व पाहतो तो आपण आपल्या राजवाड्यात नसून आपल्या सासऱ्याच्या घरी आहो, असे त्याला आढळून आले. त्यावर चिडून जाऊन त्याने राणीला या गोष्टीचा जाब विचारला. तेव्हा राणी हात जोडून नम्रतेने बादशहाला म्हणाली, ''सरकार, मला अत्यंत प्रिय अशी कोणतीही वस्तू राजवाड्यातून घेऊन यावयास आपण परवानगी दिली होती. त्याप्रमाणे मी आपल्याला येथे घेऊन आले. आपल्याशिवाय या जगात मला दुसरे काय प्रिय आहे?''

राणीचे हे चतुर भाषण ऐकून बादशहाचा राणीवरचा राग गेला व त्याने विचारल्यावरून त्याचा राग घालविण्याची ही युक्ती बिरबलाने आपल्याला सुचवली ही गोष्ट राणीने त्याच्याशी कबूल केली.

●

४७ : स्वप्नाचा अर्थ

एके रात्री बादशहास असे स्वप्न पडले की आपले सर्व दात पडले, तेव्हा काजीस बोलावून आणून त्यास या स्वप्नाचा अर्थ विचारला. काजी म्हणाला, ''सरकार, या वाईट स्वप्नाचा अर्थ हा की, आपल्या मुलाबाळास आपल्या समक्ष मृत्यु येईल.'' हे ऐकल्यावर बादशहास फार राग आला व त्याने काजीस कडक शिक्षा फर्माविली. नंतर बादशहाने बिरबलास बोलावणे पाठविले व तो आल्यावर त्यालाही या स्वप्नाचा अर्थ विचारला.



बिरबलाने लगेच सांगितले, "महाराज, आपल्या मुलाबाळांहून आपल्यास जास्त आयुष्य आहे, असा या स्वप्नाचा अर्थ आहे."

बिरबलाच्या या उत्तराने बादशहा खूष झाला व त्यास त्याने एक मोठे बक्षीस दिले.

●

४८ : आंधळे व डोळस

एके दिवशी बादशहाने बिरबलास विचारले, "बिरबल, या जगात आंधळे अधिक आहेत, की डोळस अधिक आहेत?"

बिरबलाने उत्तर दिले, "सरकार, या जगात आंधळे अधिक आहेत."

बादशहाला बिरबलाचे हे उत्तर पटले नाही. तेव्हा बिरबल

बादशहास म्हणाला, ''मी म्हणतो या गोष्टीचे प्रत्यंतर मी उद्या दाखवीन.''


दुसऱ्या दिवशी बिरबल दरबारात आला व बादशहाला बरोबर घेऊन यमुनेच्या तीरावर गेला.

दौत, लेखणी, कागद इ. लिहिण्याचे सामान घेऊन बिरबलाचा एक कारकून बिरबलाच्या हुकुमावरून आधीच यमुनेच्या तीरावर जाऊन बसला होता. त्याचप्रमाणे एक न विणलेली खाटही बिरबलाने त्या ठिकाणी रवाना केली होती.

बादशहासहवर्तमान यमुनेच्या तीरावर आल्यावर बिरबलाने वाळवंटात बसून ती खाट विणायला सुरुवात केली, तेव्हा बादशहा आश्चर्यचकित होऊन त्याला म्हणाला, ''बिरबल, हे रे काय? तू हा काय प्रकार चालवला आहेस?''

बादशहाचा हा प्रश्न ऐकल्यावर बिरबल हळूच आपल्या कारकुनाला म्हणाला, ''आंधळ्यांच्या यादीत पहिले नाव बादशहाचे लिही.''

नंतर त्या ठिकाणी पुष्कळ अमीर, उमराव, शेठ सावकार व इतर लोक आले. बिरबलाला खाट विणताना पाहून आश्चर्य वाटून त्यांच्यापैकी बहुतेकांनी त्याला ''हे काय करता?'' किंवा ''हा काय उद्योग आरंभिला आहे?'' असा एकच ठरावीक प्रश्न केला. त्यांची नावे बादशहाच्या नावाखाली आंधळ्यांच्या यादीत लिहायला बिरबलाने कारकुनाला सांगितले. पण त्यांच्यापैकी ज्या थोड्याजणांनी ''आज स्वतःच खाट विणीत आहात, याचे कारण काय?'' असे विचारले होते, त्यांची नावे



तेवढी बिरबलाने डोळसांच्या यादीत लिहविली.

काही वेळाने बिरबलाने खाट विणण्याचे आपले काम पुरे केले व बादशहाला बरोबर घेऊन परत राजवाड्यात आल्यावर डोळस व आंधळे यांच्या याद्या त्याने बादशहास दाखविल्या.

आपले नाव आंधळ्याच्या यादीत पहिलेच लिहिलेले पाहून बादशहाने नाराज होऊन बिरबलास विचारले, ''बिरबल, आंधळ्यांच्या यादीत माझे नाव पहिलेच आहेस, याचे करण काय?''

यावर बिरबलाने हात जोडून नम्रपणे बादशहास उत्तर केले, ''सरकार, मी आपल्यासमक्ष ती खाट विणावयास आरंभ केला. तो प्रकार प्रत्यक्ष पाहत असताही, ''बिरबल, तू हा

काय प्रकार चालविला आहेस?'' असे आपण विचारले, म्हणून आपले नाव प्रथम आंधळ्याच्या यादीत घातले. ज्यांनी ''स्वतःच खाट विणीत आहा, याचे कारण काय?'' असे विचारले तेच खरोखर डोळस आहेत. या दोन्ही याद्या पाहिल्या म्हणजे आंधळ्यांपेक्षा डोळसांची संख्या कितीतरी कमी आहे हे हुजुरांच्या ध्यानात येईल.''

बिरबलाचे हे भाषण ऐकून बादशहा त्याच्यावर खूष झाला व त्याच्या बुद्धीची त्याने तारीफ केली.

●

४९ : बादशहाच्या मनातील हेतू

एक दिवस बादशहा बिरबलास म्हणाला, ''बिरबल, मागे एकदा दरबारातील सर्व लोकांच्या मनातील हेतू काय हे तू सांगितले होतेस, तरी आज माझ्या मनात कोणता हेतू आहे सांग पाहू''

बिरबलाने लगेच उत्तर दिले, ''सरकार, तुमचे पितर स्वर्गात जावे, हाच तुमच्या मनातला हेतू आहे, हे माझे म्हणणे खोटे असल्यास तसे सांगावे!''

आपले पितर स्वर्गास जावे, असा आपला हेतू नाही, असे बादशहास म्हणवेना, म्हणून बिरबलाने दिलेले उत्तर बरोबर आहे, असे त्यास कबूल करावे लागले.

●

५० : खरे व खोटे यातील अंतर

एकदा बादशहाने बिरबलास विचारले, ''खरे व खोटे यातील अंतर किती ते बरोबर सांग पाहू!''

बिरबलाने चटकन उत्तर दिले, ''सरकार, खरे व खोटे यात बरोबर चार बोटांचे अंतर आहे. कारण जे आपण डोळ्यांनी पाहतो ते खरे व कानांनी ऐकतो ते खोटे. आणि डोळे व कान यांच्यामध्ये फक्त चार बोटांचेच अंतर आहे.''

●

- समाप्त -

आबालवृद्धांना वाचनिय अंर्तबाह्य आकर्षक आमची निवडक प्रकाशित पुस्तके

पुस्तकाचे नाव	पुस्तकाचे नाव
१. गोष्टीरूप रामायण	२०. मर्यादारमणच्या न्यायकथा
२. गोष्टीरूप महाभारत	२१. थोरांचे सुविचार
३. श्री मल्हारी मार्तंड	२२. सार्थ चाणक्य सूत्रे
४. श्री तुळजाभवानी	२३. गौतमबुद्ध बोधकथा
५. संतांच्या सुरस कथा	२४. सिंहासन बत्तीशी
६. श्री भक्त विजय	२५. शुक बहात्तरी
७. श्री काशीखंड	२६. कोकिळा पस्तीशी
८. गलिव्हरच्या सफरी	२७. भोजराजा व कालिदास
९. हातिमताई	२८. भारतीय स्त्री रत्ने
१०. अल्लाउद्दीन आणि जादूचा दिवा	२९. राजपुत्र ठकसेन
	३०. पितळी शहर
११. सिंदबादच्या सफरी	३१. सर्कस बहाद्दरांच्या दुनियेत
१२. ख्वाजा नसीमुद्दीनच्या गोष्टी	३२. गुल सनोबर
१३. तेनालीरामच्या चातुर्यकथा	३३. निलमणी आणि पिवळा जादूगार
१४. वेताळ पंचविशी	३४. अलीबाबा आणि चाळीस चोर
१५. संपूर्ण इसापनीती	३५. बहाद्दूर चाँद आणि कपटी जादूगार
१६. पशुपक्ष्यांचे जग	३६. अजब आणि नवलपूर्ण
१७. संपूर्ण हितोपदेश	३७. बिरबल आणि बादशहा
१८. संपूर्ण पंचतंत्र	३८. चंदेरी दुनिया
१९. कथा महाभारत	